म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
स. नं. १२४६

१२४६
काव्य

१२४६



# शीळ

ना. घ. देशपांडे

REFBK-0008336
REFBK-0008336

१६५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
१६६०१
अनुक्रमांक
विभाग १२५६
क्रमांक १५१५
नों. दि.

# शी ळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा.

# शीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८३४६
संदर्भ शाखा

कवि : ना. घ. देशपांडे

प्रस्तावना : मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष

REFBK-0008336

REFBK-0008336

किंमत ३ रुपये

मौज प्रकाशन : १३ :

प्रथमावृत्ति : ९५० प्रती
१० मे, १९५४

या आवृत्तीच्या प्रका-
शनाखेरीज बाकी सर्व
हक्क कवि नागोराव
घनश्याम देशपांडे,
मेहेकर (म· प्र.)
यांच्याकडे आहेत.

वेष्टन :
द. ग. गोडसे

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
गिरगांव, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन लि.
गिरगांव, मुंबई ४

अनुक्रम ९५५८९
विभाग क/०५
क्रमांक ९२७०
नों. दि. २५/१/५०

'रानारानांत गेलि बाइ शीळ' या कवितेची ध्वनिमुद्रिका १९३२ सालीं प्रकाशित झाली तेव्हां तिनें खळबळ उडविली. तरुण मंडळीच्या तोंडीं ती ऐकतांच बसली आणि घोळूं लागली—पण दबलेल्या सुरांत, कारण वयस्कांना आणि अकालवयस्कांना तो नवा प्रकार नामंजूर होता. संगीत म्हणून आणि काव्य म्हणूनहि. शास्त्रीय संगीताचा दबदबा होता. आणि रंगभूमीच्या त्या सरत्या वैभवकाळीं हिंदुस्तानी संगीतांतील अनवट रागांत अथवा रागमिश्रणांत आणि अवघड चालींत (कधीं त्यांत कर्नाटकी गुंता करून) मराठी शब्द, जरूर तर कानामात्रा ताणून, बांधण्याचा खटाटोप चढाओढीनें होत होता. या पदांना सहसा नाटकांतहि अर्थ नसे, मग स्वतंत्रपणें कोठचा? फार तर अस्ताईचा प्रसंगाशीं दूरान्वय जसे. अंतऱ्याला स्वतःचाच अन्वय नसे. तानांच्या लडी टांगण्यासाठीं सोयिस्कर लांबीच्या मात्रांच्या खुंट्या त्यांत हारीनें बसवीत. हें तेव्हांचें लोकप्रिय संगीत. अशा रीतीनें पदांचे तराणे आणि गायकीचे आखाडे झाले असतां सीधा ठेका व सुरेलपणा सांभाळून अर्थाची खुलावट करण्यावर भर देणारी ही नवी गीतशैली वेगळेपणानें चमकून दिसली. नवाईचा बुजरेपणा ओसरतांच तरुण रसिक तिकडे अधिकाधिक ओढला गेला. खानदानीचा ताठा उतरला नाहीं, पण तिचा आवाज फिका पडला. त्याच सुमारास त्याच गायकाची, म्हणजे श्री. गोविंदराव जोशी यांची, भास्करराव तांब्यांच्या 'डोळे हे जुल्मि गडे' या कवितेची ध्वनिमुद्रिकाहि बाहेर पडली. श्री. केशवराव भोळे यांनीं त्यापूर्वींच ती कविता ध्वनिमुद्रित केली होती, पण तिला उठाव आला नाहीं.

सौ. ज्योत्स्ना भोळे यांनींहि याच सुमारास कांहीं निवडक कविता ढंगदारपणें मैफलींत गाऊन या नव्या रुचीवर रेखीव कलेचें जणूं शिक्कामोर्तब केलें. पण या प्रतिष्ठेला पोंचतें न पोंचतें तोंच हें नवें वळण उलट दिशेनें घसरूं लागलें आणि लवकरच संगीत गेलें, काव्य गेलें,—उरलें भावगीत-गायन, अशी दुर्धर अवस्था आली. लोकप्रिय संगीताचें कंत्राट रंगभूमीकडून चित्रपटांकडे गेलें आणि या नव्या कंत्राटदाराच्या बाजारी नीतीनें त्या घसरगुंडीलाहि कसबाची

छटा दिली. ग्रॅमोफोनच्या तत्रकड्यांनीं तीच छटा लाचारीनें उचलली, कारण परिस्थितीमुळें त्यांना चित्रपटसंगीताच्या आश्रिताची कळा आली होती. ही लाचारी अनेक गायकांच्या आणि गीतकारांच्या पिंडाला मानवली. त्रिकट चालींच्या जुन्या जोखडाऐवजीं सैल चालीची नवी झूल किती हलकीफुलकी! म्हणून पूर्वींचे 'पद करणारे' आतां भावगीत बनवूं लागले, आणि भावगीतकारांची नवी वीण अशी निपजली कीं, ज्यांनीं त्या पदजुळव्यांना चांगलें म्हणावयास लावलें. तेच ते गोड शब्द घोळविले, त्यांना बालिश भावनांची डूब दिली आणि मात्रा मोजून लचक पुरवली. या सगळ्या बदफैलींत सुदैवानें कांहीं कलावंतांनीं इमान राखलें. अशा गीतकारांपैकीं ना. घ. देशपांडे हे एक. ते प्रथम कवि आणि नंतर गीतकार; कारण त्यांनीं गायकाच्या गळ्यावर आपल्या कविता घेतल्या नाहींत, तर त्यांतील गीतगुणांनीं गायक तिकडे ओढला गेला.

पण 'शीळ'च्या संगीताप्रमाणें त्यांतील काव्यालाहि त्या वेळीं कित्येक नाकें मुरडलीं आणि आठ्या चढल्या. वस्तुतः ते दिवस काव्यगायनाच्या सद्दीचे. गणेशोत्सवांत आणि तत्सम कार्यक्रमांत पूर्वीं मेळ्यांना स्थान होतें तें करमणुकीच्या या प्रकारानें आतां बळकावलें होतें. पण त्या उभय करमणुकींत बोधपरता होती; मेळ्यांत अधिक उघड, काव्यगायनांत थोडी आडून. काव्य असें सोज्वळ कीं (त्या वेळच्या) 'स्त्री-पुरुषांनीं एकत्र बसून ऐकण्याजोगें', आणि लहानग्यांस त्यांतील तात्पर्य समजावून सांगण्याजोगें. 'शीळ'चें काव्य त्या दृष्टीनें गैरसोयीचें; थोडें उनाडच. त्यांतील धुंदी आणि खुलेपणा मनांत आवडला तरी, जनांत अवघडल्यासारखा वाटूं लावणारा. तांब्यांचे डोळे 'जुल्मी' असले तरी ते बाळबोध संसाराच्या जाड भिंगांआडून, आणि त्यांची 'जादुगिरी' माजघरापुरती मर्यादित होती. तेव्हांचे लोकप्रिय गायक-कवि गिरीश, यशवंत अथवा मायदेव यांच्या काव्यांतील प्रणयहि नेमस्त असे 'प्रणयपंढरीचे वारकरी' हें ज्यांचें अर्ध-विनोदी बिरुद फार गाजलें त्या माधव जूलियनांच्या काव्यांतील प्रणयहि मर्यादशील होता. त्यांतच खुद्द कवींच्या तोंडून तो कानाला अधिकच मवाळ लागायचा. देशपांड्यांच्या प्रेमगीतांना संगीताचा पुरा साज आणि एका व्यावसायिक गायकाचा नखरेल आवाज लाभल्यामुळें जणूं त्यांच्या उन्मादाला उठाव मिळला. तो पुष्कळांना रुचला नाहीं, कारण तो अगदींच वेगळा होता.

तांब्यांचा पहिला संग्रह १९२० सालीं प्रसिद्ध झाला असला तरी ज्या विशिष्ट गीतशैलीनें त्यांना लोकप्रियता आणि चेले मिळवून दिले ती त्यानंतरच्या काळांत बहरली. त्या शैलीनें काव्यारंभीं रागाचें नांव सांगून संगीताशीं आपलें नातें घट्ट केलें; आणि अर्थाला त्याच्या नादीं लावलें. रविकिरण मंडळाचें काव्यगायन तुलनेनें बाळबोध वाटूं लागून श्रोता आतां या उघड गायकी बाजाच्या आहारीं गेला. त्याला साजेसे रंग काव्यविषयांतहि होते. रविकिरणांची फिकी वास्तवता नकोशी झाली. तांब्यांत मध्यभारतीय सरंजामशाहीचा वेगळा थाट होता; त्यांतील विलासाची सूचना रुचकर वाटली. प्रेमहि अधिक धीट झालें. पुरुष-प्रकृतीच्या वेदांती रूपकांत राधाकृष्णाच्या पौराणिक सबबींतल्याहून उन्मादाला कितीतरी मोठी सवड मिळाली. या सगळ्या भुलावणीच्या बळावर तांबेशाहीनें रविकिरण मंडळावर कुरघोडी केली. ना. घ. देशपांड्यांच्या काव्यांत नादसौंदर्य असलें, आणि उन्मादहि असला, तरी तीं तांब्यांच्या पठडींतील नाहींत. तो नाद कोमल व्यंजनें बांधून जमा केलेला नाहीं; त्यांत पदलालित्यासाठीं संस्कृत समासांचा आसरा घेतलेला नाहीं. तो जणूं अर्थाचेंच एक अंग आहे. या काव्यांत 'चाली'चा बडेजाव नाहीं. त्यांतील उन्माद रूपकाचें अंतर न ठेवतां अनुभवाच्या आधीन होतो, म्हणून त्याला वैयक्तिकतेची तीव्रता येते. तांब्यांच्या, आणि त्यांच्या चेल्यांच्या, बहुतेक कवितांत ती आढळत नाहीं.

लावणींतील उन्माद अनेकांना परिचित होता, पण तो आळीमिळीचा. ज्या सुशिक्षित वा अर्ध-शिक्षित वर्गाच्या रागलोभाविषयीं आपण बोलत आहोंत त्याला घरींदारीं सोवळी शिकवण मिळाली होती. पातकांची जी भली मोठी यादी त्याला तोंडपाठ होती त्यांत लावणी ऐकणें हें एक. तीहि बाईच्या तोंडून ऐकावयाची या संकेतामुळेंच तें पातक दुप्पट कडक झालेलें. त्यामुळें अर्थातच त्याची लज्जतहि वाढली. तें चोरून करावयाचें आणि त्याविषयीं डोळे मिचकवून बोलायचें—तेंहि खाजगींत. जरा पापभीरु पुरुष असला तर तो लावण्या चोरूनमारून फक्त वाचायचा. पण हें सगळें करून झाल्यावर वस्त्र झटकून मोकळा,—पुन्हा परीटघडीचा संभावित. आणि घडलेल्या पापाचें क्षालन म्हणून 'शिष्ट' साहित्यांतील पावित्र्य सांभाळण्याबाबत तो फार जागरूक राही. पापपुण्याच्या या पांढरपेशा हिशेबांत हाहि एक भाग होता कीं लावणी ही

जुन्या काळची; तिला इतिहासाचा आणि परंपरेचा थोडासा रंग चढलेला. या पुराणपणाची सवलत तिला द्यायला हवी; आणि उलट, त्यामुळेंच हुळहुळलेल्या कल्पनेच्या प्रभावानें ती होती त्यापेक्षांहि अधिक रंगेल वाटूं लागली. आधुनिक काव्यांत मात्र ती उत्तानता नव्हेच, पण थोडा मोकळेपणाहि नको होता. आवरलाच नाहीं तर तो प्रेमावेग गूढ रूपकांत ठेवा, झिरझिरीत अध्यात्मांत लपेटा, राधाकृष्णाचा आडोसा घ्या, निदान भारदस्त संस्कृत समासांत थिजवा. तो कदाचित् आपद्धर्म मानला जात असेल. पण प्रेमाच्या मोकळ्या उच्चाराला काव्यांत बंदी होती.

देशपांड्यांनीं 'शीळ' सप्टेंबर १९२९ मध्यें लिहिली. त्या वेळीं ते नागपूरच्या मॉरिस कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत होते. त्यानंतरच्या या दोन तपांत त्यांनीं शेंकडों कविता लिहिल्या, पण 'लिहिणें' आणि 'प्रसिद्ध करणें' हे कवि-कोशांत समानार्थी शब्द होऊन बसलेल्या त्या काळांतहि त्यांपैकीं बहुतेक कविता बाडांतच राहिल्या. या संग्रहांपैकीं एक-तृतीयांश कविता अजून अप्रकाशितच होत्या. त्यांतीलहि दहा कविता 'अप्रसिद्ध असाव्यात असा कवीचा अंदाज आहे'! अनेक कवितांचें लेखन-वर्ष कवीनें 'अंदाजें' सांगितलें आहे. (कोठल्या गाडींत, कोठल्या स्टेशनांच्या दरम्यान, कोठल्या प्रहरीं कवितेचें लेखन घडलें हा अमरपट्ट्यावरचा तपशीलवार लेख कोरण्याचा कष्टाळूपणा न दाखवून देशपांड्यांनीं भावी संशोधकांची केवढी गैरसोय केली आहे!) या संग्रहांतील अप्रकाशित कवितांपैकींहि कित्येक पंधरावीस वर्षांपूर्वींच्या आहेत! प्रसिद्धीसाटीं आसुसलेल्या, अंकाला विलंब झाला तर टचकन् डोळ्याला पाणी येणाऱ्या, उपेक्षेच्या शंकेनें कुढणाऱ्या, आणि संग्रहासाटीं प्रकाशक व परीक्षणासाटीं टीकाकार यांची केविलवाणी वाट पाहणाऱ्या हळव्या कवींच्या जमान्यांत देशपांड्यांची बेफिकिरी विलक्षणच होती. तसल्या कवींचें खत मिळाल्यामुळें केशवकुमारांच्या 'झेंडूच्या फुलां'ना केवढा बहर आला! उलट, संपादकांच्या विनंतिपत्रांना उत्तर लिहिण्यास टाळाटाळ करणारा हा कवि. फार थोड्या मासिकांना त्याच्या कविता प्रसिद्ध करण्याचें भाग्य लाभलें. त्या कवितांवर लुब्ध झालेले रसिक संग्रहाची आतुरतेनें वाट पाहात होते; कांहीं प्रकाशकसुद्धां उत्सुक होते. पण तो निघायला इतकीं वर्षें लागलीं, कारण कवीच त्याबाबत उदासीन होता. ही उदासीनता कांहींशी कवीच्या प्रकृतीचीच आणि

कांहींशी परिस्थितींतून उपजली असावी.

ना. घ. देशपांड्यांच्या कवितेवर रसिक भाळले होते खरे, पण ते संख्येनें थोडे होते. बहुसंख्य वाचकांना त्यांची ओळख असलीच तरी अगदीं पुसट होती. 'वऱ्हाडांतील आणखी एक देशपांडे' अशी मनांतल्या मनांत संभावना झाली असणार. एक तर कविता थोड्या. दुसरें म्हणजे "दावूं गाउनि आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामध्यें" या पठडींतला हा कवि नाहीं. १९४१ सालीं मुंबई रेडिओनें कविसंमेलन भरविलें. तेव्हां ना. घ. देशपांड्यांनीं कविता सरळ वाचून दाखवली—ना सूर ना ताल—आणि नाराजी ओढवून घेतली. ज्याला गळा नाहीं तो कवि कसला, ही सामान्य वाचक-श्रोत्याचीच नव्हे तर बहुतेक साहित्यिकांची भावना! गद्यपद्याविषयींच्या बालिश कल्पना तेव्हां भरांत होत्या. आतां अर्थाला उठाव देणारें काव्यवाचन ऐकून घेण्या-इतकी समज हळुहळू येत आहे. तेव्हां ती नव्हती. ध्वनिमुद्रित काव्यांबाबतहि काव्याविषयींचा पहिला उत्साह ओसरून श्रोत्याचें समस्त ध्यान संगीताकडेच लागलें होतें. तेंहि मुख्यतः चालीकडे. गीताचें 'तोंड' मोहक हवें. त्यावर सगळी मदार म्हणून त्याची सगळी मशागत. उरलेला भाग शेपटासारखा. तो सोय आणि निकड पाहून कमीअधिक लांब ठेवावयाचा. आवडीचें म्हणून गाणें गुणगुणतांना बहुतेकांच्या स्मरणाची धाव त्या 'ध्रुपदा'पुरती असायची. कडवीं 'द' किंवा 'न'च्या बाराखडीनें भरून काढायचीं. तांबे आणि रविकिरण या उभय 'घराण्यां'च्या गायकी कवितेंत ध्रुपदाची मिजास मोठी. नादमधुर हें गबाळें विशेषण खरोखर त्या तोंडापुरतेंच असे. बारीक नजरेनें पाहिलें तर तशा कवितांत सफाईदार, नाजुक अक्षरांनीं खचलेलें ध्रुपद आणि पुढें खडबडीत कडवीं अशी विजोड कामगिरी वारंवार दिसते. जातिरचनेंत ही वरच्या सफाईची मोठी सोय; म्हणून ती इतकी लोकप्रिय झाली असावी. कवितेवर तिची चालच नव्हे तर 'राग'हि सांगण्यांतील कटाक्ष अर्थपूर्ण आहे. काव्यांत संगीत असतें या तत्त्वाचा ढोबळ अर्थ घेऊन, कवितेचें स्वरलेखन जमलें कीं तिचें सार्थक झालें अशी श्रद्धा. देशपांड्यांच्या काव्यांतील संगीत केवळ चाल, नाजुक शब्द, यमकें असल्या उसन्या ढंगांत नव्हतें; तें सलग, सूक्ष्म आणि तांब्यांच्या कांहीं उत्कृष्ट गीतांप्रमाणें अर्थाशीं एकजीव झालेलें होतें. ही शब्दांत भिनलेली भाव-लय गळ्यानें ओढून काढण्यासारखी

नसते. म्हणून काव्य संगीताचें थोर वरदान असणारा हा कवि काव्य-गायनाच्या काळांतहि अनोळखीच राहिला. तोहि केवळ सामान्य वाचकाच्या हिशेबीं नव्हे. त्याला ज्यांनीं दिशा दाखवायची त्या टीकाकारांनाहि त्याची पुरी दखल नव्हती. प्राध्यापक रा. श्री. जोगांसारख्या व्यासंगी आणि मर्मज्ञ टीकाकारानेंहि १९४६ सालच्या 'अर्वाचीन मराठी काव्य' या ग्रंथांत ना. घ. देशपांडे यांना 'नवोदित' कवींच्या रांगेंत उभें करून "(त्यांच्या) जानपद वातावरणाच्या आणि प्रेमाच्या कविता अनेकांच्या मुखांत आज असलेल्या दिसतील" या पाठ-थोपटणीवर त्यांची बोळवण केली आहे. "एकत्रित काव्यसंग्रहाच्या अभावीं त्यांच्या काव्याचा योग्य तो परामर्श घेणें अशक्य झालें आहे" या त्यापुढील कबुलींत थोडीशी सबब आहे, पण ती अपुरी वाटते. कांहीं वऱ्हाडी साहित्यि-कांना या उपेक्षेंत सूक्ष्म अढी भासली. पण आतां प्रा. भवानीशंकर श्री. पंडित या तत्प्रांतीयाच्या 'आधुनिक मराठी कविता' या ताज्या (१९५३) इतिहासांत ना. घ. देशपांड्यांच्या खातीं चार ओळी अधिक खर्ची घातल्या असल्या तरी त्यांत 'पद्याचें प्रसाधन आणि नादमाधुरी' यापुरतेंच जुजबी रसग्रहण आहे. आणि "(त्यांच्या) प्रेमगीतांत भावनेच्या आविष्कृतीपेक्षां पद्याच्या प्रसाधनाला अधिक महत्त्व दिलेलें असतें," असा वर शेरा आहे. आधुनिक साहित्याचा आणखी एक ताजा इतिहास म्हणजे डॉ. वि. पां. दांडेकरांचा. त्यांत देश-पांड्यांचा केवळ नामोल्लेख आहे. दहा-पंधरा कवींबरोबर त्यांचें नांव एका वाक्यांत कोंबलेलें आहे. अशी त्यांची टीकाकारांकडून संभावना झाली आहे.

'भावगीत' हें, इतर अनेक साहित्य-प्रकारांप्रमाणें, आपण इंग्रजींतून उचललें. 'लिरिक' या इंग्रजी नांवाचें ग्रीक मूळ शोधून त्यांतील संगीत-छटा आणण्याची भाषांतरी खटपट 'वैणिक' या शब्दानें केली. पण खुद्द इंग्रजींतच ती छटा केव्हांच हरवून त्या जागीं भावपरतेचें लक्षण स्थिर झाल्याचें ध्यानांत येतांच 'भावगीत' हें नांव अधिक योग्य वाटून प्रचारांत आलें. पण नांवनिशी-बाबत व्युत्पत्तीचा पंडिती पुळका आपल्याला नेहमींच फार; तेव्हां त्याच्याशीं तडजोड म्हणून 'गीत'पद राहिलेंच! वस्तुतः इंग्रजी साहित्य विचारांतहि या काव्यप्रकाराची निश्चित सरणी नाहीं, नव्हती. काळाप्रमाणें तिचे रंग बदलत गेले. मराठी भावगीतकारांच्या पहिल्या पिढीला स्फूर्ति मिळाली ती एकोणि-साव्या शतकाच्या पूर्वार्धातील 'रोमँटिक' इंग्रजी कवींकडून. त्या कवींची

उत्कट आत्मपरता, सौंदर्यासक्ति, निसर्गपूजा, बंडखोरी इत्यादि विशेष आपल्या कवींत निरनिराळ्या मिश्रणांनीं आणि कमीअधिक प्रमाणांत उतरले. त्यांपैकीं आत्मपरतेचें माहात्म्य सर्वांत अधिक. पण रोमँटिक या शब्दाप्रमाणेंच आत्मपरता अथवा भाव-लेखन या विशेषांसंबंधीं गैरसमज झाले. वर्ड्स्वर्थच्या 'स्पाँटेनिअस् ओव्हरफ्लो ऑफ् फीलिंग्ज' या अर्ध-व्याख्येच्या चिथावणीनें धर भावना कर कविता असा धसमुसळा उद्योग शिष्टमान्य होऊं लागला. ती भावना विचारांत जिरण्याइतकी उसंत तिला न देतां वरच्या फेसाची हलकी-फुलकी मांडणी व्हायची. पण गंभीरता आणि बोधकता असल्याशिवाय काव्य 'उच्च' होणार नाहीं या संकेतामुळें सांचलेल्या आणि अचेतन विचाराचा त्याला आधार पुरवायचा. भावनेला विचाराचें वजन नाहीं कीं विचाराला भावनेची ऊब नाहीं. दोन्ही एकजीव होईनात. आधुनिक कवितेच्या पहिल्या प्रहरींच केशवसुती आवेगाला विनायकी मुरड पडली ती पुढें बहुतेक कवींच्या प्रकृतीला मानवली. चंचल भावना आणि मागें फरफटणारें शिथिल विचाराचें लोढणें या अजागळपणांत किती तरी आधुनिक कविता अडखळून पडली. ज्या कवींत ही विकेंद्रितता टळली त्यांच्या काव्यांत भावना आणि विचार यांचें रसायन एकजीव जमून आलें, आणि मुख्या भावनेंतील संकुचित आत्मनिष्ठा व्यापक झाली. वैयक्तिक सुखदुःखाचे हर्षविषाद व्यक्तीपार पसरून त्यांना परार्थ आला. कवीचें स्वप्न हें खाजगी खेळणें राहिलें नाहीं. त्यांत बहुजनांनीं आशांची पूर्ति पाहिली आणि निराशांपासून निवारा घेतला.

ना. घ. देशपांड्यांच्या कवितेंतील गीतगुण, लालित्य, ग्रामीण चित्रसौंदर्य असल्या विशेषांवर भर देण्यांत तीं केवळ गौण अंगें आहेत याची जाणीव सुटते. 'प्रेमाचे कवि' ही बावळट चिठ्ठी त्यांच्यावर डकविण्यांत येते तीहि कित्येकदां अशा अभिप्रायानें कीं नवतारुण्यांतील भाबड्या स्त्रीपूजेचीं हिरवट गाणीं लिहिणारा हा कच्चा कवि आहे. आपल्याच अवस्थेंत सांपडलेल्या वाचकांना चार क्षण झुलविण्यापलीकडे त्याच्या काव्यांत सामर्थ्य नाहीं. त्याला विचाराचें वावडें. आणखी असाहि सूर निघतो कीं, जगाकडे पाठ फिरवून प्रेमाच्या नाजुक भातुकलींत रंगलेला हा कवि 'पलायनवादी' आहे—सबब त्याचें काव्यहि पोकळ आणि तकलुपी. त्याला जीवननिष्ठा नाहीं.

खरें म्हणजे ना. घ. देशपांड्यांच्या काव्यांत आकृति, नाद आणि चित्रमयता

यांचीं ठसठशीत लावण्यें आहेत. त्यांच्या बहुतेक कविता प्रेमाविषयीं आहेत; इतकेंच नव्हे तर तें प्रेम माणसांचा वारा टाळून 'दूर रानीं' आसरा पाहतें. 'ती चकाकती सगळी दूर राहिली दुनिया। या तमामध्यें वसवूं प्रेमपीट शृंगेरी'. हें सगळें उघडच आहे. पण याहिपेक्षां कितीतरी अधिक त्या काव्यांत आहे. त्यांतील प्रेम हीच निष्ठा आहे. तें काव्यशृंगारापुरतें नुसतें प्रेमाचें प्रेम नाहीं. अति-उत्कटतेमुळें या निष्ठेला स्वप्नाचें रूप चढलें आहे. स्वप्नाप्रमाणेंच तें प्रेम क्षणपूर्तीच्या भासानें आणि विफलतेच्या चटक्यांनीं सुखवितें आणि दुखवितें. तेंहि असें कीं सुखदुःखांमधील रेषा हरवावी. पण या सनातन निष्ठेला—नैसर्गिक प्रेमाला—दुराव्यानें माणसांतून उठविणाऱ्या आणि 'ओसाडींत' वसविणाऱ्या समाजाची काळवंडलेली पार्श्वभूमि येथें आहे. 'पापीच निघाले सगळे पुत्र मनूचे'. या पापाच्या सावलीला भिऊन संकोचणारें, तर कधीं जणूं ती विसरण्यासाठीं उन्मादांत रंगणारें प्रेम, 'व्यावहारी' आणि 'स्नेहशून्य' जगाचा धाक आणि तिटकारा, यांच्या उभ्याआडव्या धाग्यांनीं हें काव्य विणलेलें आहे. त्यांतील प्रेमाचा धागा आपल्या विविधरंगी झळाळीनें नजरेंत भरतो. दुसरा जन-निषेधाचा धागा फिका वाटला तरी त्याला पीळ अधिक आहे. या वस्त्राच्या सर्व रंगच्छटा मूळ धाग्यांच्याच आहेत; नंतर बाजारी रंगोटी त्यांत केलेली नाहीं. हे सर्व घटक नितळपणें एकरूप झाले आहेत. कवितेचें परम यश म्हणजे ही एकरूपता अथवा एकात्मता. ना. घ. देशपांड्यांना लाभलेलें हें यश आपल्या काव्यप्रांतांत वाटतें तितकें सुकाळाचें नाहीं.

वस्तुतः समाजाचा धिक्कार ही आधुनिक साहित्याइतकीच जुनी गोष्ट आहे. किंबहुना ती केव्हांच साहित्यिक रूढि होऊन बसली आहे. प्रेम-प्रकरणांत हटकून बिब्बा घालणारा, तसेंच स्त्रिया (म्हणजेच देवता), मजूर-शेतकरी-अस्पृश्यादि दरिद्री, आणि सरसकट ध्येयवादी यांना गांजणारा खलपुरुष म्हणून शेंकडों नाटक-कादंबऱ्यांतून तापलेल्या विशेषणांनीं आणि उद्‌गारचिन्हांनींसुद्धां त्याला टोंचलेलें आहे. काव्यानेंहि त्याला सोडलें नाहीं. पण समाजाचें कातडें गेंड्याचें. त्याच्यावर मामुली ओरखड्यांपलीकडे कांहीं परिणाम झाल्याचें नमूद नाहीं. साहित्याचीं शस्त्रेंच बोथट अथवा लुटुपुटीचीं असें नव्हे; तर तीं चालविणाऱ्यांत 'लालित्या'चीं कांकणें हातांत भरलेले शेंदाडशिपाईच अधिक. त्यामुळें वरवर चाटता वार आणि तोहि अस्थानीं करून, जिंकल्याची

आरोळी मारणाऱ्यांच्या वीरश्रीनें साहित्य उगाच गजबजून गेलें. हरएक कथाकवितेनें दिलेल्या ढुशीमुळें समाज पुढें सरकत आहे अशी अनेकांची मठ्ठ समजूत आहे. केशवसुत, आगरकर अथवा हरि नारायण आपटे या आघाडीच्या धारकऱ्यांनीं रण गाजविलें. त्यांचें नांव घेऊन त्यांच्या हातवाऱ्यांची सुबक नक्कल करणाऱ्यांची पुढें झुंबड उडाली. केशवसुतांचा शुद्ध त्वेष किती थोड्या लोकांत उतरला! त्यांच्या मानीव वारसदारांपैकीं बहुतेकांचा 'सुधारणावाद' म्हणजे बारीकसारीक चिरच्चिर होती; त्यांची लढत नाटकी होती. त्यांना समाज 'पुढें' जायचा म्हणजे कोठें याची स्पष्ट कल्पना नव्हती. 'म्हटला तर पुढें म्हटला तर मागें' हें सावधपणाचें धोरण सोयीचें वाटत होतें. आणि एकंदरीनें मागेंच दृष्टि पुन्हापुन्हा भक्तीनें वळत होती. ना. घ. देशपांड्यांच्या कवितेची दृष्टि एकाग्र आहे—प्रेम हा तिचा अनन्यविषय. त्यांत व्यग्रता आणणाऱ्या समाजाची त्यांना उबग आहे. इतर 'सुधारणां'शीं—पर्यायानें इतर समाजदोषांशीं—त्यांना कर्तव्य नाहीं. हा एकांगीपणा असेल, पण तो काव्याला पोषक आहे. या काव्याचें बळ विखरून वायां जात नाहीं.

उदाहरण म्हणून या संग्रहांतील 'आज जाऊं दूर रानीं' या कवितेची माधव जूलियन् यांच्या 'तेथें चल राणी' या सुप्रसिद्ध कवितेशीं तुलना करण्यासारखी आहे. प्रेमपूर्तीसाठीं दूर, 'कोठें तरी रानांत' जाण्याची भूमिका उभय कवितांत आहे. तसेंच 'व्यावहारी या जगाचा कायदा हा जीव जाळी' ही देशपांड्यांची ओळ व त्याच्या मागील आणि पुढील अशा आणखी दोन ओळी कांहींशा माधव जूलियनी घाटाच्या आहेत. पण देशपांड्यांच्या कवितेंतील अधीर प्रीतीची निःसंगता आणि अगतिकता 'तेथें चल राणीं'त अल्पांशानेंहि नाहीं. कारण माधव जूलियनांचा प्रेमिक नुसताच प्रेमिक नाहीं. तो समाजाच्या दोषांची लंबीचवडी यादी आपल्या राणीला सुनवतो. रानावनांतील त्याच्या 'अज्ञात ठिकाणीं' जो स्वर्ग वाट पाहात आहे त्यांत प्रेमाशिवाय स्वातंत्र्य, शांति, साधेपणा, सत्य, निःस्वार्थता, कष्टाळू राहणी इत्यादि ध्येयांस 'पुरावाव' असल्यामुळें शेवटीं खुद्द प्रेमासच तेथें कवितेंतल्याप्रमाणेंच अवघडल्यासारखें होणार. 'ते हवेत माझे मला सखे परि भंवतिं सदा गलबला' अशी यशवंतांच्या एका नायिकेसारखी ही बापडी राणी हिरमुसणार. 'आल्या अनिकेतास खुलें स्वागत रानीं' असा गृहिणीधर्म पाळण्यास तिला बजावलें

आहे. पण शेवटची लाळूच फारच बिकट आहे :

> अंकावर खेळून शिकूं सृष्टिसतीच्या, आत्मप्रगतीच्या
> त्या गूढ कथा ज्या न कुराणीं, न पुराणीं, तेथें चल राणी

येथेंच कविता संपते. (अनंत काणेकरांनीं या बेगमेचें उत्तर कां लिहिलें नाहीं ? ती अजूनहि बेगम राहिली असावी !) शेवटीं मनावर संस्कार राहतो तो कोमट सुधारणावादाचा, किंवा ध्येयवादाचा; प्रीतीच्या आवेगाचा नाहीं. प्रीतीला नवसमाजरचनेच्या स्वप्नाचें कोंदण पुरविण्याचा हा प्रयत्न आहे म्हणावें तर कोंदणच मुख्य ऐवज खाऊन टाकतें. निबर उपदेशबाजीमुळें आणि उत्कटतेच्या अभावामुळें कवितेला कोठेंच स्वप्नकळा येत नाहीं. वास्तवतेचा आरोप करावयाचा म्हटलें तर रानावनांतील अज्ञात ठिकाण चमत्कारिक वाटतें. असो. देशपांड्यांची कविता लांबीनें बरीच लहान; अगदीं जेवढ्यास तेवढी आहे. तिची धुंदी अभंग आहे. जगाची आठवण त्यांत आहे ती विसरण्यापुरतीच आहे—आणि क्षणभर विरोधासाठीं. या रानांत 'सौंदर्यशाली' सांज 'चांदण्याची शुभ्र जाळी' विणली जाण्याची वाट पाहात आहे. प्रेमाच्या देववेवीचा 'वेडा सौदा' तिथें पटतो. काव्यहि पटतें; कारण त्यावरील अवधान एका शब्दांतहि सुटत नाहीं. देशपांड्यांची 'रंकाची राणी' ही कविताहि अशीच रानच्या स्वच्छंद प्रणयाविषयीं आहे. पण तींत पहिल्या अनावर भराऐवजीं तृप्तीचा गाढ आनंद आहे. 'नील जलांनो' या कवितेंत या राठ, जाचक आणि पापी जगाची निर्भर्त्सना आहे ती निसर्गाच्या निरागस सौंदर्याशीं विरोध दाखवून. त्यांत प्रेमाचा कोठेंच उच्चार नाहीं. ही कविताहि किती बांधीव आहे !

वरील तुलनेंत माधव जूलियन्, आणि एकंदरीनें रविकिरण मंडळ, यांच्या प्रेमकाव्यांतील पुस्तकी प्रतिष्ठितपणा आणि संकोच व ना. घ. देशपांड्यांची निर्भरता आणि धुंदी यांतील अंतर मनांत ठसेलच. पण समाजाबाबतच्या या कवींच्या वृत्तींतील भिन्नता येथें विचारांत घ्यावी. कवि म्हणून देशपांड्यांचा जन्म झाला तो काळ रविकिरण मंडळाचा ऐन मोसम होता. त्याचा उडता वास तरी त्यांच्या काव्याला लागणें नैसर्गिक आहे; आणि तो लागलाहि आहे. पण देशपांड्यांच्या काव्याचा मूळ गंधच निराळा. त्याच्या घमघमाटांत रवि-

किरणांचा मंद वास कोनाकोपऱ्यांत शोधून मिळावयाचा.

एकोणीसशेंवीसनंतरच्या दहापंधरा वर्षांत रविकिरण मंडळाला मोठी कीर्ति लाभली ती साहजिक होती. कारण त्या पिढीच्या इच्छा-आकांक्षा मंडळानें तिला समजतील आणि रुचतील अशा भाषेंत बोलून दाखविल्या. टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रांत त्यांचें राजकारण हातपाय पोटाशीं घेऊन सुस्त झालें आणि तोंवर त्याच्या कह्यांत असलेलें त्यांचें समाजकारण मात्र चेकाळून गुण दाखवूं लागलें. तें उघडपणें प्रतिगामी होतें. उत्तरपेशवाई त्याला पुन्हा निर्माण करावयाची होती; हीच त्याची संस्कृतिसंरक्षणाची योजना. उलट लोकहितवादींतून उगम पावलेला आणि आगरकरांनीं पुढें भव्यता दिलेला पुरोगामी विचारांचा प्रवाह कालांतरानें क्षीण झाला आणि गढूळहि बनला. राष्ट्रवादानें लोकसंग्रहाच्या कोत्या उद्दिष्टासाठीं जीर्ण समाजरचनेशीं तडजोड केल्यामुळें जुन्या दोषांना नव्या अभिमानाची बेगड चढली. धर्म-जातीचे सगळे क्षुद्र अहंकार पुन्हा प्रतिष्ठा पावले. इतिहासाला ते रंग फासले जाऊं लागले. यानें बुद्धिभेद झालेला सुधारक दोन्ही दगडांवर पाय ठेवून होता. गडकऱ्यांप्रमाणें त्यानें एका खांद्यावर जुन्याचा व दुसऱ्या खांद्यावर नव्याचा असे दोन्ही जरीपटके नाचवले. नव्यानें वाचा फुटलेल्या दुःखांना जुन्या उपदेशाचे वळसे दिले. आगरकरांच्या प्रखर बुद्धिवादाची निरुपद्रवी भूतदयावादांत परवड झाली.

रविकिरण मंडळाचा सुधारणावाद असाच फिकट होता. तरीहि तो—विशेषतः माधव जूलियन् यांच्यापुरता तरी—तत्कालीन रूढिग्रस्तांना जहाल वाटला. यांत त्या रूढींचा मागासलेपणा स्पष्ट होतो. स्त्री-पुरुष-संबंध हा अर्थातच अटीतटीचा विषय. त्या संबंधांतील मोकळेपणाच्या अभावामुळें संसार कुबट झाले होते. पण सनातन्यांना त्यांतच पावित्र्य दिसत होतें. या कोंडमाऱ्यांतून सरळ वाट म्हणजे बंडखोरी. ती झेपणारे फार थोडे. पळवाटा मात्र दोन होत्या. पावित्र्याचें सोंग कायम ठेवून खाजगी बदफैली ही एक. आणि दुसरी म्हणजे कल्पनेला चेतवून तिनें पुरविलेल्या मुक्त प्रणयाच्या कैफांत गुंगावयाचें. तें नेहमींच जाणूनबुजून होई असें नाहीं; कित्येक कवींचा तो प्रकृतिधर्मच होता. आणि त्यांत इंग्रजी साहित्याचें—विशेषतः 'रोमँटिक' साहित्याचें—वाचन कल्पनेला आणखी गुदगुल्या करी. तो कैफ अर्थातच कवीच्या कल्पनाशक्तीच्या प्रमाणांत कमीअधिक असे. गोविंदाग्रजांत त्याचा

जोर फार होता. वाचकाच्याहि डोक्यांत तो सहज शिरे.

गोविंदाग्रजांच्या उद्दाम कल्पनाशक्तीनें मराठी काव्यांत जें वारें आणलें त्यावर उतारा म्हणून रविकिरण मंडळानें त्याला संसाराच्या गाड्याला जुंपलें व त्याचें सौंदर्य वाढविलें असें म्हटलें जातें. कल्पनेचे पंख कापून तिच्या स्वैर भराऱ्या त्यांनीं थांबवल्या. पण संसारावर त्या पंखांचें कलम नीट जमेना, आणि दोन्ही खुरटूं लागलीं. पण उड्डाणाचा भास उगाच होत राहिला. ईर्षा उंच होत्या. कळकळहि प्रामाणिक होती. पण मंडळ झाल्यामुळें विविध प्रवृत्तींना सामावून घेतां घेतां तें इतकें पसरट होऊन बसलें कीं त्याला आकार येईना. नवे-जुने, शहरी-ग्रामीण, पंडिती-अपंडिती, कवि-अकवि यांची भेसळ झाली. त्यांतच बहिरंगाची चिकित्सा आणि कौतुक फार वाढलें; इतकें कीं अंतरंग जेवढें बाहेर येऊन बसेल तेवढें छान असें वाटूं लागलें. गणमात्रांचे नवीन सांचे बसवून अथवा जुने मुद्दाम हुडकून त्यांवर नांवनिशी चिकटविण्याच्या हव्यासांत खुद्द काव्याची आबाळ झाली. 'प्रयोग' याला इतकाच अर्थ उरला. ना. सी. फडक्यांचे गद्यांतील सुबक सांचे याच सुमाराला बाजारांत आले आणि लोकप्रिय झाले. त्यांच्या प्रेमालाहि 'उत्तान'—आणि त्यांना 'प्रेमाचे कादंबरीकार'—म्हणण्याचा प्रघात पडला. तें प्रेम फक्त सुबक होतें. 'कोठें तरि जाऊं बसुनी'चा रविकिरणी 'अज्ञात' ध्येयवाद लवकरच वि. स. खांडेकरांत रंगून उठला. तोहि सुबक होता. संसारतापानें जिवाची 'तलखली' झाल्यास या काव्यानें आणि साहित्यानें गारव्यासाटीं पाणपोई पुरवली. तींत तापदायक समाजाला उपदेशाच्या चार गोष्टी कधीं गोडीगुलाबीनें तर कधीं हडसूनखडसून सांगण्याचीहि सोय होती.

ना. घ. देशपांड्यांच्या कवितेला समाजाला कांहीं सांगायचें नाहीं. ती आपल्याच मर्यादित परिघांत गुंगलेली आहे. त्या परिघांत अन्य विषय येत नाहींत. या प्रणय-धुंद काव्यांतील स्त्री ही केवळ स्त्री आहे—ती परजातीची अथवा संपत्तीनें परवर्गांतील नाहीं; परित्यक्ता नाहीं, पतिता नाहीं, अथवा बालविधवाहि नाहीं. तिच्यावर कसलाहि अन्याय झालेला नाहीं. तिच्या स्त्री-त्वाला असा कोणताच आगंतुक गुण चिकटविलेला नसल्यामुळें तिच्याविषयींचें प्रेम 'शुद्ध' आहे—म्हणजे तें फक्त प्रेम आहे. त्यांत दया, सहानुभूति, उद्धार इत्यादि 'सामाजिक' लचांडें नाहींत. जेथें समाजाचा विसर पडायला प्रेम

शोधायचें तेथें पुन्हा त्याच्या बऱ्यावाइटाची उजळणी कशाला ? 'झालें जगाचें कडें माझ्यातुझ्याएवढें' असें आपल्यापुरतें जग आवरणारी ही प्रेम-समाधि आहे. ती उपऱ्या विचारांनीं ढळत नाहीं.

पण या प्रेमांत जशी जगाची बाधा नाहीं तसा अध्यात्माचाहि नेहमींचा एखादा आव नाहीं. अलौकिक उत्कटतेचें हें प्रेम सर्वस्वीं लौकिक आहे; शारीर आहे. त्याला सांकेतिक आडपडदा नाहीं. कवीला प्रीतींतून मुक्ति नको; प्रीति हीच त्याची मुक्ति. त्या पिढींतील अर्धवट सुधारकाला स्त्रियांना गोषांतून बाहेर काढायचें होतें; पण स्त्री-प्रेमाला झिरझिरीत कां होईना पण कसला तरी गोषा चढवायचा होता. देशपांड्यांनीं तो कधींच पाळला नाहीं. उलट, बहुतेक उर्दू प्रेम-कवींची सुंदरी गोषांतलीच, पण त्यांचे शाब्दिक विलास उठवळ असायचे. ती स्त्री विशिष्ट नाहीं,—कोणतीहि स्त्री. फक्त ती लावण्याची पुतळी हवी. माजलेल्या कल्पनेनें तिच्या अंगप्रत्यंगांचीं वस्त्रगाळ वर्णनें घोटावयाचीं; सगळीं सौंदर्यें अवयववार कोरावयाचीं—पण तीं सांकेतिकच. देशपांड्यांच्या कवितेंतील स्त्री ही केवळ स्त्री असली तरी या उडाणटप्पू उर्दू अर्थानें कोणतीहि स्त्री नाहीं. तिला नांवगांव नसलें, तरी व्यक्तित्व आहे; म्हणून निष्ठा आहे. तिच्या विरहाची अथवा अप्राप्तीची वेदना जिव्हारींची आहे; फक्त शब्दांना धार काढून खेळविलेली नाहीं. आणखी एक महत्त्वाचा फरक असा कीं, देशपांड्यांनीं 'सजणी'च्या सौंदर्याचा कोठें फारसा गवगवा केला नाहीं. तिचे डोळे 'निळे फार फंदी' आहेत; तिची 'चांदणी कळा' आणि 'नवी नव्हाळी' कोठें उठून दिसते. पण हा अलग तपशील नाहीं. त्या भारलेल्या आठवणी आहेत. 'नजरेचें जुगार तुझ्यामाझ्यांत ग'. ही प्रीति स्त्रीवर आहे; सौंदर्यावर नाहीं. प्रीतीच सुंदर आहे; व तिच्या किमयेनें त्या स्त्रीला 'लावण्यकळा आगळा' चढली आहे.

पण विसरूं म्हणून जग विसरतां येत नाहीं—निदान फार काळ नाहीं. त्याची कमी-अधिक दाट सावली देशपांड्यांच्या काव्यावर पडलेली आहे. त्या जगांत प्रीति करपून जाते. म्हणून येथें प्रीतीला मखर दिलें आहे तें अंधार, 'हिवाळी चांदणें', धुकें, असल्या कुंद निसर्गाचें. तिची कळी फुलते ती सहसा गर्द वनांत. 'मधुजाल तमानें विणलें रे'. अंधाराचा आसरा मोठा; तेथें प्रीतीचा 'सवता सुभा' विश्वासानें निर्माण होतो. 'काळ्या गढीच्या जुन्या

ओसाड भिंतीकडे' प्रेम सफल होतें; आणि विफलतेनें झुरतें तेंहि 'ओसाडींत बसून'. या कवितांतील धुक्याचे उल्लेख मोजण्याजोगे आहेत. माघाची शिरशिरी अनेक कवितांतून भरून राहिली आहे. सुगीची 'नवकळा' अथवा 'शरदाच्या ढगाची झील' पहिल्यापहिल्या कवितांपैकीं थोड्यांना लाभली आहे. वसंताची मिरास या कवीनें मानलेली नाहीं. या झांकळलेल्या निसर्ग-साजांत नुसताच वेगळेपणा नाहीं. त्यांत अर्थपूर्ण अनुरूपता आहे.

प्रेमाच्या होष्रांत समाजाचे पाश तोडणाऱ्या किंवा तोडूं पाहणाऱ्या या काव्यांत खोलवर त्या पाशांचे वळ उठलेले आहेत. त्यांच्या अस्वस्थ आठवणींनीं 'ऊन-साउली'ची मिश्र—म्हणून कांहींशी नाट्यमय—रंगत कवितांना येतेच. पण ते पाश अटळ आहेत, प्रेमाइतकेच अनिवार आहेत, ही जाणीव कधीं सुटत नाहीं.

मलाहि कळतें सगळें पण हें मन होतें भयभीत तरी :
कशी त्यजूं जनरीत तरी !

या शंकेनें व्याकुळ झालेली कोणी 'कुलवंता' पुढें 'देवधर्म सोडूंच कशी?' असें विचारते. तिचे सामाजिक संस्कारहि गाढ आहेत. ही ओढाताण कविता-कवितांतून मनांत भरते. 'चिरलांच्छित ही आपुलकी'. प्रीतीच्या तृतीलाच 'चोरी', 'लाज', 'चुकी' असले अर्ध-ओशाळे शब्द येथें आढळतात ते त्यामुळेंच. 'मनांतले अन् जनांतले हे दुवे' सहसा जुळत नाहींत. अंतरांतील संकोच उधळून लावावा ही प्रीतीची मनीषा; त्यासाठीं ती राना-वनांतील अंधार आणि चांदणें शोधते. पण क्षणभरच्या स्वैरतेंत वर्तनांतील संकोच ढळला तरी अंतराच्या गाभ्यांतून तो कधीं सरत नाहीं. चुकलेल्या अथवा मुक्या कोकराची प्रतिमा अनेकदां येते तिचा संदर्भ, मला वाटतें, असाच कांहींतरी असावा. येथें गळा चढविणारी कोकिळा अथवा मैना क्वचितच भेटते. एरव्हींचें संगीत हळुवार आणि भित्रें आहे; कुजबूज आणि गुणगुण यांहून वर सूर लागत नाहीं. 'शीळ' घुमते, पण तीहि अगदींच पहिल्या बहरांत. तेथेंहि 'राया तुला रे ताळमेळ नाहीं' म्हणून दब्रकावणी आहेच. स्वच्छंद प्रेमाच्या या स्वप्नांत कसली तरी 'काळी निनांवी भिती' तरळते. तिच्या विरोधी छटेमुळें स्वप्नाचे रंग खुलले तरी ती केवळ खुलावटी-

साठीं केलेली नाहीं. प्रेमाइतकीच ती सत्य आहे. किंबहुना, एका अर्थानें तर प्रेमाचें स्वप्न म्हणून ती अधिक सत्य आहे. या दीनवाणेपणाची दुसरी बाजू म्हणून

**कुजबुजतो तो आहे विकृत ;**
**मुकाच बसतो तो आहे मृत :**
**कर हिरिरीनें अन् त्वेषानें**
**आवेशानें उंच तुझा स्वर ;**

अशी प्रखर चेतवणी 'तूंच भिला तर' या कवितेंत आढळते; पण तिची भूमिका प्रेमाची नसून कांहींशी राजकीय आहे. ही कविता अगदीं अलीकडची. तिच्या पहिल्या ओळींला पश्चात्तापाचा वास येतो का ? या सगळयाच प्रेमांत तो सूक्ष्मपणें कोठें तरी वावरत असल्याचा भास होतो.[१]

**आज जरी अंधार भासतो गगनावर या असा,**
**उद्यां बहरेल चंद्रिका नवी.**

असला भरवसा एखादे वेळीं वाटला ('काल, आज आणि उद्यां') तरी तो फिकटच. प्रेमाची शिरजोरी आणि समाजाचें दडपण अशा दुहेरी सत्तींतून या काव्याला त्याचें विशिष्ट स्वरूप आलें आहे.

मग हें काव्य त्या समाजाविरुद्ध बंडाचा आवाज कां उठवीत नाहीं ? कवीची प्रकृतीच मृदु हें त्याचें उत्तर नव्हे. सांकेतिक बंडखोरीसारखीच ही मृदुताहि अनेकदां फसवी असते. निष्प्रेम जगाचा निषेध यांतील अनेक कवितांत आहे. 'दूर रानीं' प्रीतीच्या तालांत हिंडत 'उभ्या विश्वास निंदूं' हा साजणीचा बेत

---

१. या संग्रहांत नसलेल्या त्यांच्या एका कवितेंतील पुढील ओळी पाहा :

"आवेगाचें आलें वादळ :
उधळविल्या मग मी वाऱ्यावर
उपदेशाच्या सर्व चिटोऱ्या !
... ... ... ...
सारें वादळ ओसरल्यावर
माझें मन पण अथांग भीषण
अनुतापांतच पार बुडालें !

प्रेमापुरताच घेतला पाहिजे. 'इथें ममतेस मोबदला हवा' म्हणून 'देश हा परका'; म्हणून प्रेमाला वनवास. कवीला जगाचा वैताग येतो तो त्यांतील आपुलकीच्या अभावामुळें. पण यापलीकडे त्याचें जगाशीं फारसें भांडण नाहीं. असलेंच तर तें जुनेपणाच्या अभिमानानें आहे. नीतिमूल्यें सोडल्यामुळें नवें जग घसरलें—'स्वत्वाला विसरून' अभिमानशून्य भारतानें संस्कृति सोडली म्हणून त्याचें भाग्य संपलें—ही कवीची श्रद्धा. ती ठासून उच्चारणाऱ्या कांहीं कविता देशपांड्यांनीं लिहिल्या आहेत. त्या या संग्रहांत नाहींत; पण त्यांपैकीं 'आर्यांचें गाणें' या कवितेंतील

> **एक राज्य जगतावर पसरूं; विश्व करूं आर्य हें**
> **जिंकत जिंकत पुढेंच पसरूं; कार्य शिरोधार्य हें**
> **पतित पुरातन पुन्हा आज हा उंच धरूं बावटा**
> **उठा हो उठा...**

या ओळींवरून त्या श्रद्धेचे रंग आणि तिची दिशा ध्यानीं यावी. समतेसारखे नवे आदर्श त्यांना मान्य नाहींत. धुंद प्रेमाच्या शाहीराच्या सामाजिक निष्ठा अशा असाव्यात हें विलक्षण आणि विसंगत वाटेल; पण त्यांची संगति त्या पिढीच्या दुहेरी जीवनाच्या संदर्भात लावतां येईल. निदान तत्कालीन निम-सुधारक कवींची दुटप्पी मनोरचना देशपांड्यांत नाहीं हा त्यांचा प्रामाणिकपणा लक्षणीय आहे. वस्तुतः त्या बहुतेक कवींचे धर्म-संस्कृति-परंपराविषयक विचार देशपांड्यांहून फारसे निराळे नव्हते; पण गोंधळामुळें किंवा आधुनिकतेच्या बहाण्यासाठीं त्यांनीं काव्यांत ती नवी झूल पांघरली. म्हणून अनेकदां ती प्रेम-काव्यांतहि अकारण लडबडतांना दिसते. देशपांड्यांच्या काव्यांत कसलाच उसना साज नाहीं. त्यांतील प्रेमाची उत्कटता असंबद्ध विचारांमुळें कमी होत नाहीं हें त्या काव्य-यशाचें रहस्य; पण कवीच्या मनांत मुरलेल्या विचारांचा वास त्या प्रेमाच्या वेषाला आणि प्रतिमांना येतो हेंहि खरें. तो वास कोणाला आवडो वा न आवडो, पण तो सच्चा आहे.

असें कवीचें जग प्रेमापुरतेंच अपूर्ण आहे; त्याला पूर्णता आणील असें प्रेमहि आदर्श हवें. त्याची आस या कवितेला लागली आहे. 'सुंदरतेचें मोहक दारुण घडलें दर्शन'—ती 'चिन्मय तारा' ज्यानें ओझरतीहि पाहिली,

त्याची अशांति 'चिरदाहक'. ती सुंदरता एखाद्या व्यक्तींत सामावलेली नाहीं, म्हणून एवढी दुर्लभ. तरल आणि बहुरंग कल्पना तिचें चित्र काढते, पण ती चित्रांतून सृष्टींत उतरत नाहीं. अशी तिची 'अव्यक्त तऱ्हा'. अशा 'कुण्या तरी चांदणीकडे' ही प्रेमकविता झेपावत आहे. कधीं झिंगलेल्या कल्पनेच्या किमयेनें पूर्तीचें कैवल्य लाभतें. पण अशा कविता थोड्या आहेत; फारच थोडया. 'गहन मनिषेनें जतन केलेल्या, पण नऽ घडलेल्या, मधुर मीलनाचें गीत' अशी त्यांची जात आहे. पण ती गुंगी फार काळ टरत नाहीं. ती उडतांच बेचैनी येते; एकलेपणाच्या झळांनीं जीव होरपळून निघतो. या व्यथांनीं आणि हुरहुरींनीं देशपांडयांची बहुतेक कविता भरलेली आहे. हवें आणि आहे यांतील सांखळी जुळत नाहीं.

**अंतराचा रंग कोठेंही जुळेना**
**भावनेचा गंध कोठें आढळेना**
**यौवनामध्यें कधींचा धुंडतों मी**
**आवडीचें फूल कोठेंही फुलेना**

तें 'श्रेयस्' वणवण फिरूनहि गवसत नाहीं; म्हणून थकलेलें जीवन 'झुरतें ओसाडींत बसून'. त्याचे ऊन उसासे कवितेकवितेंत आहेत. पण नको म्हणून तें खूळ सुटत नाहीं.

**जावा भास जुना म्हणून फिरलों:**
**तो होत नाहीं कमी:**
**सारें जीवन डावलून बसलों**
**येऊन खेड्यांत मी.**
**प्रीतीच्या मुलुखांतली मग पुन्हा आतां नको बातमी.**

'समाधी' सारख्या कवितेंत त्या उदासीनतेला जणूं मूर्तरूप येतें. 'अपमृत्यू'-तहि त्या भयाण अतृतीचें प्रतिबिंब आहे. आशा-निराशांची ही 'जीवनकंथा' सर्वस्वीं कल्पनेनें विणलेली आहे, कीं तिला अनुभवाचीं ठिगळें लावलेलीं आहेत, लावलीं असल्यास त्यांच्यावर नेमकें बोट ठेवतां येईल का, असल्या शंका मनांत चुकचुकतात. पण त्यांचा सहज निरास व्हावा असली अजागळ

कामगिरी ही नाहीं. आणि अनुभवाला वास्तवांत कोंडून ठेवणेंहि कांहींसें मठ्ठपणाचेंच होईल. जेथें वास्तव आणि कवीचें स्वप्नजीवन सरमिसळ आहे, आणि त्यांची परस्परांशीं लय लागते तेथें एकाला दुसऱ्यापासून अलग कसें काढणार? अर्थात् हें सगळें मानलें तरी कांहीं प्रश्न उरतातच. त्यांपैकीं एक, असा कीं यांतील प्रेमपूर्तीच्या आणि तत्सम अनेक कवितांत सजणाच्या मानानें साजणींत अधिक धिटाई आहे हें कसें?

'प्रेमाचे कवि' हा देशपांड्यांवर छाप मारला जातो तसा 'ग्रामीण (किंवा जानपद) कवि' हा आणखी एक. इंग्रजींतील 'पॅस्टोरल पोएट'चा हा मराठी अवतार. उसन्या उत्साहामुळें व्हायचे ते धिंडवडे येथेंहि झाले. इंग्रजींतील या प्रकारामागें ग्रीक-लॅटिन-फ्रेंच परंपरेचें बळकट सूत्र होतें; व त्याची कृत्रिमता हाहि त्यांतील एक धागा होता. आपण भाषांतरी घाईत तें नांव सैल करून खेडेगांवाविषयींच्या सर्वच काव्याला लटकावून दिलें. वस्तुतः काव्याचा असा नकाशा अथवा तक्ता काढण्यांत कांहीं विशेष तथ्य नाहीं. पण असली अकारण कारकुनी आपल्या टीकाकारांच्या हाडींमासीं खिळलेली आहे. देशपांड्यांना 'ग्रामीण कवि' म्हटलें कीं गांवढळ शब्द अंतराअंतरानें पेरून सुंदर निसर्ग आणि साधींभोळीं माणसें यांच्याविषयीं खोटीं गाणीं भरडणाऱ्यांपैकीं ते एक असा व्यर्थ ग्रह होतो. त्यांचें काव्य शहरापासूनच नव्हे तर कसल्याच गांवापासून दूर राहतें. त्यांतील निसर्गसौंदर्य अनुषंगानें आलेलें आहे; अनुपानासाठीं ओढूनताणून आणलेलें नाहीं. आणि अगदींच अपवादादाखल चारदोन गाणीं सोडल्यास त्यांत कोठें 'जानपद' भाषेचा अट्टाहासहि नाहीं. आपलें बरेंचसें ग्रामीण (अथवा जानपद) काव्य हा 'शहरी' (म्हणजे कोंदटलेल्या आणि बकाली) कवींचा विरंगुळा आहे; शब्दांशीं खेळ आहे. देशपांडयांत किंवा त्यांच्या काव्यांत कोठलाच 'शहरी' अंश नाहीं—म्हणून खेडवळ सोंग नाहीं. प्रा. भवानीशंकर श्री. पंडितांचें म्हणणें : "आडवळणाच्या वसतीमुळें देशपांडयांचें लक्ष शहरांतील हालचालींकडे गेलेलें नाहीं. त्यांनीं धनगर, किसान व गवळी यांवर गीतें लिहिलीं आहेत. परंतु तीं त्या ग्रामीणांच्या आनंदावर आधारलेलीं आहेत." देशपांडयांच्या कवितांत आनंदापेक्षां निराशा अधिक असल्याचें आपण पाहिलेंच आहे. त्यांनीं इतरां'वर' लिहिलें नाहीं, इतकी तद्रूपता त्यांच्या कवितांत आहे. 'आडवळणाची वसती' इतकें मात्र निरपवाद खरें.

ना. घ. देशपांडे यांनीं शिक्षणासाठीं खामगांव व नागपूर येथील कांहीं वर्षांचें वास्तव्य सोडल्यास मेहेकर या खेडेवजा तालुकागांवीं आपलें आजवरचें आयुष्य घालविलें.

देशपांड्यांच्या शैलीचा गोडवा वाखाणतांनाहि सावधपणा बाळगला पाहिजे; कारण शैली आणि गोडवा यांबाबत शाळकरी मुलींना फार तर साजून दिसतील अशा कल्पना आपल्या अनेक वरिष्ठ साहित्यिकांच्याहि डोक्यांत मुरडत असतात. अनुप्रास, यमक, पदलालित्य इत्यादि 'युक्त्या' चलाखीनें वापरून गोड शैली बनवितां येते—काव्याला विषय कोणताहि असो, अथवा नसो—ही त्या कल्पनांची अक्का! तिच्यामागून इतर. जसे कांहीं विषयच 'काव्यमय', तसेच कांहीं शब्दहि काव्यमय. ते कोठेंहि टाका, हटकून गुण. ग्रॅमोफोन अथवा चित्रपट या तेजीच्या बाजारांसाठीं आजवर कित्येकांनीं हे नाजुक घाणे सांगून-सवरून चालविले; परंतु घरंदाज मानल्या जाणाऱ्या कितीतरी कवींनाहि या सवंग 'काव्यमय'तेचा मोह वारंवार पडला. देशपांड्यांच्या या कवितांत ओळीओळींतून साजुक शब्द भेटतात, अनुप्रासांचीहि त्यांत रेलचेल आहे, यमकें आहेतच; पण हीं सगळीं काव्याच्या ओघांत येतात. त्यांचें वेगळें अस्तित्व जाणवूं नये अशीं जणूं तीं काव्यांत विरघळतात. यमकें आहेत, पण तीं यांत्रिक नाहींत; अनेकदां तीं स्वच्छंद आणि सैल असतात. अनुप्रास फार झाले कीं प्रौढ रुचीला त्यांचें हसूं येतें; पण हें व अन्य नादसौंदर्य अंगचेंच असलें, पूर्णपणें अर्थांकित असलें, किंबहुना अर्थांतूनच स्फुरलेलें असलें, कीं तें अनिवार्य वाटतें. देशपांड्यांच्या काव्यांत बहुशः ही अनिवार्यता पटते. त्यांचें प्रेमतादात्म्यच नादमय आहे ही जाणीव होते. क्वचित् कोठें लकब म्हणून अनुप्रासादि अलंकारांचा अतिरेक भासेल; पण तो अपवादासारखा. एरव्हीं ही सगळी नादाची मुलायम कुसर सुखविते. तिच्यांत कांहींच कृत्रिमता नाहीं. ती अलंकारासारखी नाहीं; अंगभूत आहे. या काव्याचें अंतरंगच ललित आहे. त्यामुळें येथें किती तरी साध्यासुध्या, राकट—म्हणजेच 'काव्यहीन'—शब्दांनाहि लालित्याचें पाणी चढलें आहे. म्हणून ते खुपत नाहींत. या समरसतेंत देशपांड्यांच्या शैलीचें परम यश आहे.

या कविता वाचल्यानंतर त्यांच्या नादाइतकींच त्यांतील शब्दचित्रें फार काळ मनांत तरळत राहतात.

जरा निळया अन् जरा काजळी
ढगांत होती सांज पांगली :
ढवळी ढवळी वर बगळयांची संथ भरारी, गऽ !

अथवा

हुंकारला पारवा ;
तेजाळला काजवा ;
हालून गेला जरा काळोख चोहूंकडे !

अशीं किती तरी चित्रें वर्षानुवर्षें रसिक-स्मृतीला बेचैन करतात. पहिल्या वाचनांतील तजेला एका छटेनेंहि हरपत नाहीं. पुनर्वाचनानें आतुरता मंदावण्याऐवजीं दुणावते—व अशाच तन्मय वाचनांत एखादें अर्धेमिटलें लावण्य अकल्पितपणें उमगतें आणि वाचक आनंदानें शहारतो. क्षणभर जणूं मूळ अनुभूति वाचकाच्या अंगोपांगांतून सळसळून जाते. सगळया देहाचें विषयावर ध्यान लावून कवि सगळे ‘ पंचरंगी सूर ’ शोषून घेतो. ‘ तन्मात्रांचे पांच नानाविध नाच—’ सारखी आध्यात्मिक परिभाषा कोठें आढळली, तरी त्या नाचाच्या तंद्रींत शरीराचें भान सुटत नाहींच, उलट तें शतगुणित आणि अतिसूक्ष्म होतें. सरूपता लाभते ती परमार्थाशीं नव्हे, अनुभवाच्या ऐहिक विषयाशींच. हा ब्रह्मानंद जगापारचा नाहीं.

हीं सगळीं सुंदर चित्रें कल्पनेच्या नशेंत निर्माण झालेलीं आहेत. पण कवीच्या अंतर्जीवनानेंच त्यांचें साहित्य पुरविलें आहे. कुंद रंगांकडे कल दिसला, किंबहुना अनेकदां प्रतिमांच्या कडा लवचिक अथवा निसरड्या वाटल्या, तर त्याचें रहस्य या कवि-वृत्तीच्या आतुरतेंत शोधावें. त्याचप्रमाणें हें प्रतिमाविश्व कोणाला मर्यादित भासेल; पण ही सगळी निर्मितीच केंद्रित आहे. कवि इवल्याशा भाव-कोषांत गुंगलेला आहे. ‘ सर्व रात्रभर निजला, जिवलगा, कळींत सुगंध ’. या सगळया प्रतिमा लहानशा परिसरांतील आहेत. तो परिसरहि वर सांगितल्याप्रमाणें अंधार, धुकें, गर्द वन यांनीं भारलेला आहे. त्याच्या छायेंत कित्येकदां वेगळया प्रतिमाहि नजर नीट ठरण्यापूर्वीं एकाच घाटाच्या, अगदीं एकसारख्या, असाव्यात असें भासतें. कांहीं नादांच्या पुनरावृत्तीनेंहि तो भास बळावतो. पण असा वाटतो तेवढा तोचतोपणा येथें

जरा निळया अन् जरा काजळी
ढगांत होती सांज पांगली :
ढवळी ढवळी वर बगळयांची संथ भरारी, गऽ !

अथवा

हुंकारला पारवा ;
तेजाळला काजवा ;
हालून गेला जरा काळोख चोहूंकडे !

अशीं किती तरी चित्रें वर्षानुवर्षें रसिक-स्मृतीला बेचैन करतात. पहिल्या वाचनांतील तजेला एका छटेनेंहि हरपत नाहीं. पुनर्वाचनानें आतुरता मंदावण्याऐवजीं दुणावते—व अशाच तन्मय वाचनांत एखादें अर्धेमिटलें लावण्य अकल्पितपणें उमगतें आणि वाचक आनंदानें शहारतो. क्षणभर जणूं मूळ अनुभूति वाचकाच्या अंगोपांगांतून सळसळून जाते. सगळया देहाचें विषयावर ध्यान लावून कवि सगळे 'पंचरंगी सूर' शोषून घेतो. 'तन्मात्रांचे पांच नानाविध नाच—' सारखी आध्यात्मिक परिभाषा कोठें आढळली, तरी त्या नाचाच्या तंद्रींत शरीराचें भान सुटत नाहींच, उलट तें शतगुणित आणि अतिसूक्ष्म होतें. सरूपता लाभते ती परमार्थाशीं नव्हे, अनुभवाच्या ऐहिक विषयाशींच. हा ब्रह्मानंद जगापारचा नाहीं.

हीं सगळीं सुंदर चित्रें कल्पनेच्या नशेंत निर्माण झालेलीं आहेत. पण कवीच्या अंतर्जीवनानेंच त्यांचें साहित्य पुरविलें आहे. कुंद रंगांकडे कल दिसला, किंबहुना अनेकदां प्रतिमांच्या कडा लवचिक अथवा निसरड्या वाटल्या, तर त्याचें रहस्य या कवि-वृत्तीच्या आतुरतेंत शोधावें. त्याचप्रमाणें हें प्रतिमाविश्व कोणाला मर्यादित भासेल; पण ही सगळी निर्मितीच केंद्रित आहे. कवि इवल्याशा भाव-कोषांत गुंगलेला आहे. 'सर्व रात्रभर निजला, जिवलगा, कळींत सुगंध'. या सगळया प्रतिमा लहानशा परिसरांतील आहेत. तो परिसरहि वर सांगितल्याप्रमाणें अंधार, धुकें, गर्द वन यांनीं भारलेला आहे. त्याच्या छायेंत कित्येकदां वेगळया प्रतिमाहि नजर नीट ठरण्यापूर्वी एकाच घाटाच्या, अगदीं एकसारख्या, असाव्यात असें भासतें. कांहीं नादांच्या पुनरावृत्तीनेंहि तो भास बळावतो. पण असा वाटतो तेवढा तोचतोपणा येथें

नाहीं. प्रत्येक प्रतिमा त्या त्या अनुभवाला बिलगलेली आहे. या कवितांत वारंवार येणाऱ्या प्रतिमांचे परस्परांशीं दुवे जोडल्यास त्या सांखळीनें कवीच्या अंतराचा परिघ अजमावतां येईल. जी 'धुंद एकली नदी' या प्रेम-गीतांत पुन्हापुन्हा भेटते, तिचा उगम, वळणें आणि खोली यांचीं कोडीं कोणी उकलून दाखवील का ?

हें सगळें चित्रसौंदर्य आणण्यासाठीं देशपांड्यांना विशेषणांना फारसें वेटीस धरावें लागलेलें नाहीं हें लक्षणीय आहे. विशेषणांच्या अतिरेकानें जडावलेली कविता आपल्या परिचयाची आहे. कवितेला वजन आणि 'नादमाधुर्य' पुरविण्याचा तो खात्रीचा उपाय असावा. सांकेतिक विशेषणेंच नव्हेत, तर हट्टानें बांधलेलीं वेगळीं विशेषणेंहि अनेकदां मुळावरील लक्ष ढळवितात, आणि स्वतःकडे तें खेचून विसंगत अर्थलहरी निर्माण करतात. काव्ययोगांतील नवशिक्यांना ही विशेषणांची बाधा फार !

देशपांड्यांच्या शैलीवर विविध संस्कार झाले असावेत. संतकाव्याच्या व्यासंगाची जशी साक्ष आहे, तसा लोकगीतें व लावणीवाङ्मय यांचा रसरशीत-पणाहि येथें उतरलेला आहे. आपली बरीचशी 'आधुनिक' कविता हें बळ पाठीशीं नसल्यामुळें, संस्कृत शब्द आणि इंग्रजी घडण या जोड-उसनवारींत मरगळून गेलेली आहे. लावण्यांतील शिळा शृंगार अनेकांनीं चोखाळला ; पण त्यांची भाषेची रग ज्यांनीं आत्मसात् केली त्यांच्या काव्याला निराळेंच पाणी चढलें. देशपांड्यांच्या भाषेंतील वऱ्हाडी लकबी वाचतांच उमगतील ; कांहींना त्या खटकतील. आपल्याच पंचक्रोशींत आणि पोटजातींत वापरतों ती 'शिष्ट' भाषा, उरलेली अशिष्ट, हीच ज्यांच्या भाषाभिमानाची (आणि ज्ञानाची) व्याप्ति ते या 'अशुद्धां'ना नाक मुरडतील. ही कविताच 'पुस्तकी' नाहीं ; म्हणून तिची भाषाहि शब्दकोशांतून वेचून काढलेली नाहीं. ती नैसर्गिक आहे. पण हा 'वऱ्हाडी'चा उपयोगहि देशपांड्यांनीं फारच थोड्या वेळां केलेला आहे आणि तोहि (कांहीं 'जानपद' कवींप्रमाणें) केवळ चूष म्हणून नव्हे.

ग्रांथिक (म्हणजे मुख्यतः संस्कृतप्रचुर) भाषा आणि जिवंत बोली यांचें देशपांड्यांच्या शैलींतील मिश्रण कोणाला गंगाजमनी वाटेल ; पण तें अनैसर्गिक नाहीं. काव्यमय भाषा कृत्रिमच असली पाहिजे, रोजच्या व्यवहारांत मळलेले शब्द रसहानि करतात, ही ज्यांची काव्याविषयीं—आणि एकंदर साहित्याविषयीं

—सोंवळी कल्पना त्यांना हा संकर दुःख देईल. "फार नको वाकूं जरी उंच बांधा; फार नको झांकूं तुझा गौर खांदा' या उघड्या, आणि फाजील सोप्या, भाषेनें एका टीकाकाराला अस्वस्थ केल्याचें आठवतें. पण आपल्या काव्यशैलीचा इतिहास नीट निरखला तर वेळोवेळीं जातिवंत कवींनीं ती कृत्रिमतेकडे—पुस्तकीपणाकडे—झुकूं नये म्हणून बोलीचा मोकळेपणानें उपयोग केल्याचें ध्यानांत येईल. त्या त्या वेळीं गतानुगतिक वाचक आणि टीकाकार यांनीं "ही गद्यप्राय, काव्यहीन, खडबडीत शैली—ही शैलीच नव्हे" म्हणून ओरड केलेली आहे. केशवसुतांपासून आजच्या नव्या कवितेपर्यंत टप्प्याटप्प्यावर ती नियमितपणें झाली; पण त्यानें कोणी खरा कवि बिचकून गेलेला नाहीं. माधव जूलियन्, निशिगंध, काणेकर व अनिल इत्यादींनीं रूढ शैलींत हा कसदार बोलीचा प्रवाह मिसळण्याचे कमीअधिक धाडसी प्रयोग केले ते अभ्यासण्यासारखे आहेत. पण त्यांतील जड संस्कृत शब्दांचें काय? ज्ञानसंस्कारांनीं समृद्ध झालेल्या कवीच्या व्यक्तित्वाचे ते सहजोद्गार असतात. जेव्हां ते तसे नसतात, आणि भारदस्तपणाच्या सोसानें मारूनमुटकून आणलेले असतात, तेव्हां जाणत्या वाचकाला त्यांची कृत्रिमता खटकते. कवितेची भाववृत्ति आणि तिची भाषा यांची मिळणी झाली पाहिजे; तेथें सुट्या शब्दांचें गणगोत तपासण्याची गरज नाहीं. कोठें साधेपणाहि कृत्रिम होईल! म्हणून याबाबत निर्वाणीचे नियम आंखून देणें मठ्ठपणाचें ठरेल. तरीहि 'शैली' आणि 'बोली' यांत स्पृश्यास्पृश्यभाव मानणें हें त्याहून अधिक मठ्ठपणाचें याबद्दल वाद नसावा. देशपांड्यांनीं मुख्यतः जिवंत बोलीतून आपली 'शैली' बांधलेली असली तरी ठायीं ठायीं, कधीं विशिष्ट अर्थच्छटा दाखवण्यासाठीं तर कधीं रसाच्या ओघांत, संस्कृत शब्दांचा वापर विनासायास केला आहे. 'किशोरी' अथवा 'उत्कंठा' यासारख्या कवितांत तर कोणाला तो अतिरिक्त वाटेल. पण रसांत न्हाऊन निघालेल्या आणि अर्थानें तळपणाऱ्या त्या शब्दांतील जाड्य जाऊन त्याऐवजीं बोलींतील चैतन्याचा त्यांना स्पर्श होतो. ही किमया सर्वच 'गंगाजमनी' काव्याच्या भाग्यांत असते असें नव्हे!

पण फक्त शब्दांच्या वापराबाबतच ना. घ. देशपांड्यांत बोलीचें सामर्थ्य आणि सहजता आहे असें नाहीं. तिच्या उच्चारांतील मोकळीकहि कवितेंत बोलण्याची लय आणि मस्ती आणते. एरव्हीं गणमात्रांच्या करड्या हिशेबानें

आणि यतीच्या धाकांत कवाईत केल्यासारखी चालणारी कविता आपल्या सरावाचीच आहे ! या कवितेंतील सैलपणा—थोडासा स्वच्छंदपणा—तिच्या हालचालींत सहजसौंदर्य आणतो.

कविता म्हणजे कृत्रिमता, हरघडीच्या जीवनापासून दूर ठेवलेला कसलातरी ‘पवित्र’ उद्योग, हा पिढ्यान्‌पिढ्या आपल्या कु-शिक्षणानें मनांत भरविलेला भास असल्या शैलीनें कमी होईल. असे अनेक वातड ग्रह आणि कोत्या कल्पना खिळखिळ्या करण्याचें सामर्थ्य ना. घ. देशपांड्यांच्या काव्यांत आहे.

नादांचीच नव्हे तर शब्दांचीहि पुनरावृत्ति करण्याची देशपांड्यांची लकब कांहींशी लोकगीतांतून उचलल्यासारखी वाटली, तरी ती त्यांच्या काव्यप्रकृतीला पूर्णपणें अनुरूप आहे. अशा पुनरावृत्तीनें सहसा वाचक जणूं गुंगीमुळें डोलतो, तर कधीं चेतविला जातो. ही उभय करामत या काव्यांत आढळेल; पण दुसरीपेक्षां पहिलीच अधिक.

अशी विविध सौंदर्यें देशपांड्यांच्या काव्यांत आहेत. कांहीं उडत्या वाचनांतच मनांत भरतात, तर कांहीं इतकीं गहिरीं आहेत कीं त्यांचा थांग तरल आणि तल्लीन वाचनांतच लागेल. हें काव्य नवें कीं जुनें, त्यांतील जीवनदर्शन पुरोगामी कीं प्रतिगामी, इत्यादि प्रश्न त्याच्या आस्वादाआड येऊं नयेत. कवीनें स्वतःशीं पूर्ण इमान राखलें आहे या प्रभावी सत्यांतच अशा प्रश्नांचें निराकरण होतें. रसिकाला मोह घालणारी या कवितेची कांति उसनी नाहीं. ती अंगची आहे. भाव आणि त्याचें गीत यांच्या गाढ मीलनांतून निथळणारी ती कांति कांहींशी चिकित्सेपारच राहणार. तिची धुंदी रसिकांत उतरते यांतच तिचें साफल्य—आणि त्याचें ऋण.

[illegible]

# शीळ

रानारानांत गेलि बाइ शीळ !
रानारानांत गेलि बाइ शीळ !

राया, तुला रे, काळयेळ नाहीं !
राया, तुला रे, ताळमेळ नाहीं !
थोर, राया, तुझं रे, कुळशील !

येड्यावानी फिरे रानोवना :
जसा कांही ग मोहन कान्हा !
हासे, जसा ग राम घननीळ !

वाहे झरा ग झुळझुळ वाणी ;
तिथं वाऱ्याचिं गोड गोड गाणीं :
तिथं राया, तुं उभा असशील !

तिथं रायाचे पिकले मळे ;
वर आकाश शोभे निळें :
शरदाच्या ढगाचि त्याला झील.

गेलें धावून सोडुन सुगी ;
दुर राहून राहिली उगी :
शोभे रायाच्या गालावर तीळ.

रानिं राया जसा फुलावाणी
रानिं फुलेन मी फुलराणी :
बाइ, सुवास रानिं भरतील !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम १५५८२९
विभाग ८०१०५
क्रमांक १२२७७
नों. दि. २५५/५४
वाचनालय
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

फिरुं गळ्यांत घालुन् गळा ;
मग घुम ऽ व मोहन शिळा ;
रानिं कोकीळ सुर धरतील :
" रानारानांत गेलि बाइ शीळ ! "

सप्टेंबर, १९२९

# कंचनी

झालें आज मी बावरी, बाई, भागले लोचन !
कोठें हालली वल्लरी, कोठें नाचलें नंदन ?

होती एक आशा मला : सारें धुंडलें मीं वन ;
गेलें प्राजक्ताच्या तळीं : तेथें दिसेना तो पण.

सारीं हासलीं हीं फुलें ; सारें नाचलें हें वन ;
बाई, लाजली ही कळी : तिचें घेऊं का चुंबन ?

हाका घालतें कां कुणी ? माझें धुंदलें हें मन :
वेड्या लाघवानें कशी करूं फुलांची गुंफण ?

खालीं सारखे आणतो वारा परागांचे कण ;
त्यांनीं माखलें हें असें माझें हिऱ्याचें कंकण.

झालें एक मी साजणी : कुठें माझा गऽ साजण ?
झालें एक मी कंचनी : करूं कोणाचें रंजन ?

६ एप्रिल, १९३०

# तुझ्यामाझ्यांत ग ऽ!

आज आहे, सखे,
बहुरंगी, अपार—
नजरेचें जुगार
तुझ्यामाझ्यांत ग ऽ!

आज आहे, सखे,
निशिगंधांत गंध
श्वसनांचा प्रबंध
तुझ्यामाझ्यांत ग ऽ!

आज आल्यात ग ऽ!
पावसाच्या सरी,
भावनेच्या भरी
तुझ्यामाझ्यांत ग ऽ!

आज नाहीं, सखे,
येथ कोणी दुजें;
आणि 'माझें-तुझें'
तुझ्यामाझ्यांत ग ऽ!

आज पाहूं नको
विस्मयानें अशी :
प्रीत आहे पिशी
तुझ्यामाझ्यांत ग ऽ!

तुझ्यामाझ्यांत ग ऽ!
तुझ्यामाझ्यांत ग ऽ!

सप्टेंबर, १९३१

# तळमळ

मी सुखांत घालूं हात कुणाच्या गळां ?
राहिलों इथें : पण नाहीं लागला कुणाचा लळा.

मज एकहि नाहीं कुणी सखासोबती :
ममतेविण हिंडत आहे हें जीवजात भोवतीं.

वंचनाच दिसते इथें सदा सारखी ;
हें स्नेहशून्य जग : येथें कोठची जिवाची सखी ?

हें वरून आहे असें, तसें अंतर :
हे उदास जीवा, नाहीं, बघ, इथें कुणी सुंदर !

विक्राळ, घोर अंधार जरी कोंदला
पळ एकच झळकत आली : लोपली वरच चंचला.

पोसून ध्येयशून्यता उथळ अंतरीं
शून्यांतच वाहत जाते ही मानवता नाचरी.

माझा पण आतां पुरा जीव भागला :
मज करमत नाहीं येथें, ने मला दूर, वादळा !

१२ नोव्हेंबर, १९३२

# मालन

• १ •

इवला झरा गायन गात ;
चांदण्यांसवें हासली रात ;
हालेना जरा वेलीचें पान ;
निजली धरा ; निजलें रान.
आई, बहिणी झोपल्या घरीं :
ये गऽ ये गऽ ये मागल्या दारीं !
माथ्यावरतीं आला चंदीर
सांग, मीं कसा धरावा धीर ?
भागले डोळे वाट पाहून :
प्रीतीची माझी ये गऽ मालन !

• २ •

पुष्पावरतीं दवाचे बिंदू ;
अंतराळांत सुंदर इंदू ;
पानोपानीं कीं नाजूक वारा ;
झीमझीम कीं झडीच्या धारा ;
तशीच येते मूक, मोहन
आंगण्यांतल्या वेलीमधून
शरदाची कीं दवळी रात ;
हासली प्रीत आंतल्या आंत !
दावितें कोण हंसीची मान ?
हासून येते माझी मालन !

• ३ •

पाहून तुझे काजळी डोळे
माझें गऽ मन भुललें भोळें !
कपाळावरी चांदणी कोर ;
मुक्त सोडला केसांचा भार ;
हासणें गोड लावण्यखाणी ;
कंठामधून कोयळगाणीं;
फुलांचे हार शोभले गळां :
रानराणीचा शृंगार भोळा.
कोणाचें ध्यान, कोणाचें गान,
प्रीतीचें कोण, सांग, मालन ?

• ४ •

एकाएकीं कां थांबली अशी ?
संध्येची दूर चांदणी जशी !
मूर्तच जशी हाले चाले ना !
उभी कां दूर अधोवदना ?
कंपन ओठीं ; लाज नयनीं :
बावरू नको, रानहरिणी !
काय मनांत भीती सारखी :
नको गऽ, परी— होऊं पारखी !
प्रीतीला नाहीं भीतीचें भान :
प्रीतीची माझी देवी मालन.

• ५० •

एकमेकांच्या आलिंगनांत
भावनामय चुंबनगीत ;
एकमेकांच्या नयनांवरी
प्रीत मोहक, मूक, नाचरी ;
एकमेकांचा हृदयनाद
घालत आहे एकच साद.
झुळला झरा गायन गात ;
चांदण्यांसवें हासली रात ;
हाललें जरा वेलीचें पान ;
हासली धरा ; हासलें रान !

२५ नोव्हेंबर, १९३२

# ये शेवटीं तरी तूं

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

हे भागलेत डोळे, नाहीं उसंत जीवा:
वेडा अमीर माझा, बाई, कुठें बघावा !

चिंतून लौकिकाशीं संकोचलें जराशी
होऊन तों उदासी गेला उडून रावा.

सारेच हासले गऽ: आला असेल राग:
हा धुंद फुंद नाग डोलून कां फिरावा ?

भारी अधीर तूंही; केली कशास घाई ?
नाहीं तुला मनाई: येतें तुझ्याच गांवा.

माझी झुरे नवाई: माया तुला न कांहीं:
वेडीपिशी कशीही घेतें तुझ्याच नांवा.

कां रे मनांत किंतू आतां, सख्या, परंतू:
—ये शेवटीं तरी तूं सोडून भेदभावा.

८ डिसेंबर, १९३२

# सुगी

पूर्णच्या पाण्यामधीं पार नाहिला :
येऊन द्या देवानंऽ हा दिला कौल चांगला.

चौफेर वनावर फळाफुलांच्या सरी ;
डोईवर गेली, बाई , औंदाच जवारी, तुरी !

मी राखण करतें बरंऽ किती नेहमीं :
शेतांत नांदते ; आतां येईल घरा लक्षुमी.

मळणी, अन् उफणी तशी करूं सोंगणी ;
फिरफिरूं जशा हरिणी गऽ आम्ही मग साऱ्या जणी !

कां उगाच हसतां मला, अहो घरधनी !
मी खरोखरच भाग्याची लाभलें तुम्हांला किनी ?

सासरीं सरू, गोठ्यांत जसंऽ वासरूं :
येईलच मायघराला घरट्यांत जसंऽ पाखरूं.

येऊं दे पण, सांगतें, भराला सुगी :
वाहीन, माय अंबाई, पहिलीच तुला वानगी !

१९३२

# सुगी

पूर्णेच्या पाण्यामधीं पार नाहिला :
येऊन दया देवानंऽ हा दिला कौल चांगला.

चौफेर वनावर फळाफुलांच्या सरी ;
डोईवर गेली, बाई, औंदाच जवारी, तुरी !

मी राखण करतें बरंऽ किती नेहमीं :
शेतांत नांदते ; आतां येईल घरा लक्षुमी.

मळणी, अन् उफणी तशी करूं सोंगणी ;
फिरफिरूं जशा हरिणी गऽ आम्ही मग साऱ्या जणी !

कां उगाच हसतां मला, अहो घरधनी !
मी खरोखरच भाग्याची लाभलें तुम्हांला किनी ?

सासरीं सरू, गोठ्यांत जसंऽ वासरूं :
येईलच मायघराला घरट्यांत जसंऽ पाखरूं.

येऊं दे पण, सांगतें, भराला सुगी :
वाहीन, माय अंबाई, पहिलीच तुला वानगी !

१९३२

# देवधर्म

तुला न कळलें, मला न कळलें, तरी वाढली प्रीत अशी,
चंद्रकोर शुद्धांत जशी !

हळूहळू हळुवार सख्या, तूं प्रेमबोल लागला म्हणूं
सारंगीचे सूर जणूं !

भिरभिर फिरते प्रीत आंतली, प्राणसख्या, अनिवार अशी,
आभाळावर वार जशी !

मनांतले अन् जनांतले हे दुवे, सख्या, जुळतील कधीं ?
सांग मळे फुलतील कधीं ?

मलाहि कळतें सगळें पण हें मन होतें भयभीत तरी :
कशी त्यजूं जनरीत तरी !

तशांत आहें मी कुलवंता, पापभीरु सुकुमार अशी :
देवधर्म सोडूंच कशी ?

१९३२

# कुणकूण

वाळलीं सगळीं फुलें, उरला तरी पण वास हा;
लोपली वनदेवता, पण राहिला वनवास हा.

पालवी झडली, तरी उरलें जुनें पण पान हें.
गांव तें उठलें, तरी उरलें अजून वसाण हें.

अग्नि तो विझला जरी, निघतो तरी पण धूर हा.
वेदना सरली जरी, सुकतो तरी पण नूर हा.

घोर वादळ संपलें, पण राहिली हुरहूर ही;
चंद्रिका विझली, तरी उरलीच रात्र निसूर ही.

वाद ते मिटले, तरी पण राहिलेत विषाद हे.
साद ओसरले, तरी पण राहिले पडसाद हे.

घाव तो बुजला जरी, उरली तरी पण खूण ही.
तें रहस्यच लोपलें, पण राहिली कुणकूण ही.

१९३२

# आज जाऊं दूर रानीं

प्रीत ही आली भराला : वेल ही सौंदर्यशाली.
आज जाऊं दूर रानीं : साजणा रे, सांज झाली !

आजपावेतों जगाचे पाश होते प्राक्तनीं हे :
स्वैरता घेतील आतां अंतरें संकोचलेलीं.

मी अशी माळीण भोळी : सारखी घालीन माळा :
लाघवानें पुष्पमाळा गुंफणारा तूंच माळी.

ये, उभ्या विश्वास निंदूं ; प्रीतितालानेंच हिंडूं :
ही निशा गुंफील आतां चांदण्यांची शुभ्र जाळी.

गालिचे आहेत जेथें कोवळ्या दुर्वांकुरांचे,
ये, तिथें लाजून वाचूं अंतरांचे लेख गालीं.

वित्त, विद्या, मान सारे तुच्छतेनें, ये, झुगारूं :
व्यावहारी या जगाचा कायदा हा जीवजाळी.

कायदा येथील न्यारा : ये, करूं वेडाच सौदा :
प्रेम दे, अन् प्रेम घे अन् यौवनाची ही नव्हाळी.

१९३२

# कधीं व्हायचें मीलन ?

कुठवरी पाहूं आतां वरी चांदण्याचें जाळें,
अवकाश काळें काळें ?

काय पाहूं आतां खालीं भूमि प्रस्तर पाषाणीं—
सागराचें पाणीपाणी ?

आसमंत हासे खेळे : भासे निरर्थ पसारा :
जीव झाला वारावारा.

सापडेना वाट कोठें : हारवलें देहभान
उदासलें माळरान.

भावनेच्या परागांनीं लिहियेलीं गूढ गाणीं
अंतराच्या पानोपानीं.

आतां भागले हे डोळे : भवतालीं काळी रात :
कुठें पाहूं अंधारांत ?

काय नाहीं दयामाया ? माझें जाळसी जीवन :
कधीं व्हायचें मीलन ?

१३ जानेवारी, १९३३

# मोटकरी

ही मोट भरे भरभरा ;
चढे करकरा जी !
विहिरींत बघा वाकुनी
जरा धाकुनी जी !
पाण्यांत लई भोवरे
फेस गरगरे जी !
    अजून काम राहिलंऽ—करा ;
    कसून कंबरा कसा जरा ;
    थुय्‌थुई फिरे हा झरा :
    लावणी करा जी !

चौफेर बहरला मळा :
खुले नवकळा, जी !
काळींत दिसे हीवरा
गहूं हरबरा, जी !
लवलवति कसे नाचरे
ओंबिचे तुरे, जी !
    वरून सांजकाळ साजरा
    हसे : अतां चला चला घरा ;
    पन्‌ धनीन है माहिरा :
    जीव घाबरा, जी !

कुठवरी धरूं तर असा
तुझा भरवसा, जी !
कोवळा चढे मोकळा
राघुचा गळा, जी !

राहिला कुठें तर दूर
सखूचा नूर, जी !
  सदाकदा मनास लागणी :
  —हसे, बघा, वरून चांदणी :
बांधून बैल दावणीं
म्हणा लावणी, जी !

२ फेब्रुवारी, १९३३

# रानराणी

तूं पूस डोळयांतलें पूरपाणी,
                    रानराणी !

निमिषभर रहा तूं ;
त्वरित परत जा तूं :
राहील चित्तांतल्या गूढ पानीं
                    ही कहाणी.

करुण हृदयगानें
भर नंतर रानें :
दूरांत येतील ते सूर कानीं
                    दीनवाणी.

१५ मार्च, १९३३

# गरगरा फिरे भिंगरी !

गर्‌गरा फिरे भिंगरी–जशी–गर्‌गरा फिरे भिंगरी !
लय् गोड सखूचा गळा :
मैनाच म्हणूं का तिला ?
अंगावर नवती कळा—उरावर उडवित आली सरी.

सारखी करी हुरहुरा ;
हाणते सखू पाखरा :
सावरून पदरा जरा—मळाभर फिरते ही साजरी.

ये पिसाटवारा पुरा !
अन् घाबरली सुंदरा :
ये माघारी झरझरा—मिळाली संगत मोटेवरी.

'ये जवळ हरिण-पाडसा !'
लावला सूर मीं असा ;
अन् साथ करत राजसा—सरकली जवळ जरा नाचरी.

घेतला सखूचा मुका :
(हं—कुणास सांगूं नका !)
हलतांच जराशी मका उडाली वाऱ्यावर बावरी.
गर्‌गरा फिरे भिंगरी–जशी–गर्‌गरा फिरे भिंगरी !

२७ मार्च, १९३३

# या रामपहारीं

तूं हळूच येतो, चंद्रा, माझ्या मागं ऽ !
भयभीत अशी मी : कुणीच नाहीं जागं ऽ.

हें पाठीमागं ऽ तुझं ऽ च हसरं ऽ बिंब ;
अन् समोर माझी पिशी साउली लांब ऽ.

या समोर गायी उभ्या गांवकोसांत ;
हे ढवळे ढवळे ढग वरले हसतात.

या रामपहारीं गारच आहे वारा ;
वर कलला हारा : पाझरते जलधारा.

मी अधीर झालें : घरीं निघालें जाया :
ही गारठली रे, कोमल माझी काया !

हें माघामधलं ऽ हींव : थरकतें अंग ;
हुरहूर वाटते : कुणीच नाहीं संगं ऽ.

पण हसतो कां तूं : मनांत आलं ऽ पाप ?
मी नवती नारी : बघ सुटला थरकांप.

अन् नकोस हासूं, चंद्रा, माझ्या मागं ऽ !
भयभीत अशी मी : कुणीच नाहीं जागं ऽ.

मार्च, १९३३

# उन्मनी

बाहेर गहन अंधार फार दाटला ;
पण घरांत ही पुनवेची शशिकलाच तूं हासली.
बाहेर माघमासांत वाळला मळा ;
पण घरांत हसते माझ्या तूं सुंदर चाफेकळी.

बाहेर मुकीं झालींत रानपांखरें ;
पण आंत म्हणत आहे हें कोवळें प्रीतिगीत तूं.
मिटवून नयन तिमिरांतच निजलीं घरें ;
पण घरांत हारोहारीं लाविलेस हे दीप तूं.

नाहींच जरी ही मुळीं ढगाळी निशा :
सदनांत तुझ्या भुवयांचें हें इंद्रधनू नाचतें.
कां उगाच माझ्या नुरांत चढते नशा ?
तूं तुझ्या मदिर नयनांनीं नुसतेंच जरी पाहते.

भलतीच, गडे, भरविलीस तूं उन्मनी :
हे अनंत जीवनधागे गुंतले तुझ्या लोचनीं !

जून, १९३३

# निद्रा

चंद्रप्रकाशांतून ही कादंबिनीपुंजांतुनी
सौंदर्यशाली श्यामला धुंदींत ये वातायनीं :

निद्रिस्त दोन्ही लोचनें ; ही मुक्त सोडी कुंतला ;
भालीं चकाके चांदणी ; कंठांत नाचे चंचला.

उत्फुल्ल या हृत्पंकजीं चालून आली मोहना :
गेलें मिटूनी पद्म : तों माझी विरे संवेदना !

२२ जुलै, १९३३

# इशारा

संध्येचे, सखये, तरंग पिवळे चुंबीत होते नभा ;
होती मंगल सांजवात सदनीं लावीत तूं बैसली ;
दाराशींच तुझ्याकडे बघत मी होतों मजेनें उभा ;
काळी चंद्रकळा, शशांकवदने, होतीस तूं नेसली !

तेव्हां जें वठलें हळूहळु तुझ्या संगीत ओठांवर
गाणें तें पहिलें अजून घुमतें चित्तांत माझ्या, सखे !
होती ती घटिका निरामय, तुझा होता गळा सुंदर :
तें सारें श्रुतिसंहिताच मजला, झालें तुला पारखें.

नाचावी लहरी जलावर तशी प्रीती तुझी पावन—
पाण्याच्या लहरीपरीच ठरली आतां अशी नाचरी.
माझा नाश करावयास असला झालीस तूं कारण.
मी माझा नुरलों ; उदास फिरतों ओसाड माळावरी.

जीवाचें जळ घालुनी फुलविलें—तूं जाळिलें नंदना ;
आतां हास : पुढें निरंतर तुला जाळील ही वंचना !

३ ऑगस्ट, १९३३

# येशील का रे?

एकदां पाहिलें : लागली माया ;
माझी रे, कोवळी वाळली काया !
    नवीन लोचन आले :
    आणखी अधीर झाले.
वाटतें तुला रे, पाडील भूल
प्रीतीचें पहिलें साजूक फूल !

एकली बागेंत हिंडत होतें :
हासत हासत आलास तेथें.
    पाहिलें—पाहिलें तूंही :
    गेलें मी लाजून, बाई !
प्रीतीच्या नाजूक लागल्या झळा ;
जाळींत मैनेचा चढला गळा.

नदीच्या किनारीं होतें रे, उभी !
हळूच चांदण्या हासल्या नभीं.
    आलें हें भरून ऊर ;
    हिंडलें हिंडलें दूर :
वेगळ्या आपल्या मिळाल्या वाटा ;
नदीच्या पाण्यांत नाचल्या लाटा.

थांबला जरासा गेलास दूर :
आतूर आशेचा सुकला नूर,
    सुकलें चांदणें जळीं ;
    सुकली चाफ्याची कळी ;

अवतीं भवतीं  नव्हतें दुजें :
वाळूंत चुंबिलें  पाऊल तुझें.

तुझाच सांगतें  लागला ध्यास ;
तुझ्याच नांवाचे चालले श्वास ;
    डोळयांत कोंडले आसू :
    नको रे, जीवन नासूं !
एकदां पाहिलें : लागली माया ;
माझी रे, कोवळी वाळली काया !

३ सप्टेंबर, १९३३

# कोण, कुठें आहेस तरी !

उगाच फिरते तरल कल्पना बहुरंगी, अनिवार पिशी,
वस्तुशून्य प्रणयांत अशी.
फलकावर फिरविली कुंचली स्वैर गतीनें कशी तरी
चित्र निघालें रम्य परी !
आवरतों पण तरी चालतों पुनःपुन्हा मी पुढें पुढें—
कुण्या तरी चांदणीकडे !
निशिगंधाचा परिमळ भरला; फूलच नाहीं दिसत तरी :
ही भरली हुरहूर उरीं.
धुक्यांत भरलें मधुर चांदणें, दिसतच नाहीं कोर कशी ?
ढगांत दडली चोर जशी.
पुरे तुझी अव्यक्त तऱ्हा;
तुलाच भुलला जीव पुरा;
कधीं सांग येशील घरा ?
तुझेंच, ललिते, अधीरतेनें चित्र चिंतितों परोपरी !
—कोण, कुठें आहेस तरी !

१ डिसेंबर, १९३३

# साद ही नाहीं तुम्हाला

धुंद या वाणींत येते पांखरांची स्वैरता :
साद ही नाहीं तुम्हांला, कां तुम्ही वेडावतां ?

मुग्ध संध्याराग माझा, अन् उषा ही सावळी—
काय, हो, हातांत येते तोलतां ? ही अंधता.

गूढ अव्यक्तांत आहे चारुतेची चांदणी :
चर्मचक्षूंनीं कुणाला काय येतें पाहतां ?

अंतरीं व्याकूळ होतों ऐकतां आरोप हे :
मर्मभेदी हे विषारी घाव कां, हो, घालतां ?

'हेंच गा अन् तेंच गा' कां घालतां हीं बंधनें :
मोहना माझी असावी ना कुणाची अंकिता.

पूजितों निष्पाप माझी देवता प्रेमोज्ज्वला :
दूर जा, मंदीरदारीं पाय कां हे ठेवतां ?

नेटकी विक्री कराया सज्जले भोंदू निराळे :
मी असा हा प्रेमयोगी : काय दावूं दीनता ?

१२ डिसेंबर, १९३२

## खरी प्रीती

हासावी विधुसंगतीं विधुकला
होतें तसें जीवन ;
मीं होता नवरत्नहार रचला
गुंफून आशाकण ;
डोळ्यांना भलतीच भूल पडली ;
अन् धुंद आली मना :
मोहाच्या पटलांत एक गमली
तूं मूर्त देवांगना :
प्रीती मागितली खरी ; पण खरी प्रीती मिळाली कुणा ?

आतां मात्र पुरा प्रकाश पडला :
सारेंच हें वेगळें.
आहे माळ उभा भकास पिवळा ;
लोपून गेले मळे.
जावा भास जुना म्हणून फिरलों :
तो होत नाहीं कमी :
सारें जीवन डावलून बसलों—
येऊन खेड्यांत मी.
प्रीतीच्या मुलुखांतली मग पुन्हा आतां नको बातमी.

१८ डिसेंबर, १९३३

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क.

# किशोरी

कुठें चाललीस तूं, किशोरी, कुठें चाललीस तूं ?

कलशाशीं कुजबुजलें कंकण
'किणकिण किणकिण रुणझुण रुणझुण' :
कुठें चाललीस तूं, किशोरी, कुठें चाललीस तूं ?

चरणगतींत तुझ्या चंचलता
मधुर-रहस्य-भरित आतुरता :
कुठें चाललीस तूं, किशोरी, कुठें चाललीस तूं ?

गहन-गूढ-मधुभाव-संगिनी,
गहन-तिमिरगत चारुरूपिणी,
कुठें चाललीस तूं, किशोरी, कुठें चाललीस तूं ?

अंधारावर झाली भवतीं
तरलित पडसादांची भरती :
कुठें चाललीस तूं, किशोरी, कुठें चाललीस तूं ?

स्वप्नतरल हृदयांतच या पण
कां केलेंस सताल पदार्पण ?
कुठें चाललीस तूं, किशोरी, कुठें चाललीस तूं ?

१९३३

# मी आलें लडिवाळ

“ नांव सांग तव काय आणखी अंतरांतला भाव,
वनांतरीं शिरकाव कशाला ? दूर राहिला गांव.”

“ मी नारीची जात आणखी धनवंताची नात :
कूळशील अन् जात सोडली : जाउं कशी नगरांत ?”

“ उबार वाटे बात : घालशी अस्मानाला हात ;
मिळेल का रानांत, साजणी, जिवाजिवाची जात !”

“ नागिण मी बेभान : चाललें कुठें तरी हें गान ?
उतावीळ हैराण धावतें : कुठें केतकीपान ?”

“ कुणीकडे फिरणार : अशी तूं कोमल आहे नार ;
मंजुळवाणी फार बोलशी वीणेवरची तार !”

“ वाट अशी खडकाळ, सख्या रे, रात अशी अवकाळ :
मी आलें लडिवाळ, सख्या, तूं कर माझा प्रतिपाळ !

करूं नको नाराज, उदारा, कळे न का आवाज ?
भूल पडे का आज जिवाला ; जुनाच आहे साज.”

“ अधीर उडतो ऊर सारखा, मनीं उठे काहूर :
हा मैनेचा सूर वाटतो अन् चंद्राचा नूर.”

“ उदास कासावीस हिंडतें—उदास कासावीस :
ओळखलें नाहींस काय रे, अरे तीच मी—तीच !

“ —वाट अशी खडकाळ, सख्या रे, रात अशी अवकाळ :
मी आलें लडिवाळ, सख्या, तूं कर माझा प्रतिपाळ !”

१९३३

# हें जीवन

चिरदाहक चिंतनांत चढतें—चढतें जीवन झुरलें, रे!
कसलें जीवन, आतां नुसतें—नुसतें मरणच उरलें, रे!

झडलीं पानें, पुष्पें पहिलीं:
काट्यांची खाईच राहिली:
जीर्ण, गलित पर्णांतच फुलते—फुलते गुलाब पुरले, रे!

वीज हरवली : उरलें वादळ,
दिवाच विझला : उरलें काजळ:
हताश हृदयांमधून पुरतें—पुरतें तिमिरच भरलें, रे!

शून्य मनानें बसलों वाचित
तिमिरामधलें निर्दय संचित:
संवेदन नसतांही नुसतें—नुसतें मन हुरहुरलें, रे!
कसलें जीवन, आतां नुसतें—नुसतें मरणच उरलें, रे!

१९३३

१२ ऑगस्ट
१९३७

## वाटते लाज रे !

एक होतास रे तूं उभा संगतीं
स्नेहमय सोबती !
आणि होतें, सख्या, गूढमय तें अती
दाट तम भोवतीं !

या तनूभोवतीं पाश होता तुझा ;
भाव नव्हता दुजा.
कौतुकानेंच तूं ऐकला, राजसा,
बोल माझा पिसा !

आणि होता तरी ऊर नव नाचरा ;
नूर लव लाजरा
धुंद होतों उभे दूर एकीकडे ;
अन्य नव्हतें, गडे !

काय, बाई, तरी
चंद्र आला वरी !
चाल, सजणा, घरीं !
ऐक, झालें सख्या, चंद्रमुख हासरें :
वाटते लाज रे !

७ जानेवारी, १९३४

# तुटूं दे !

जीवावर बांधव सारे उठलेत—उठूं दे !
संबंध दिखाऊ सारे तुटलेत—तुटूं दे !

उद्दाम, अघोरी, स्वार्थी, घनघोर जगाला
पाहून उदासी डोळे मिटलेत—मिटूं दे !

व्याकूळ, करंट्या, माझ्या गततेज जिवाला
पाहून पुराणे प्रेमी विटलेत—विटूं दे !

आघात किती सोसूं मी दिनरात्र मुक्यानें :
हा ऊरच आवेगानें फुटणार—फुटूं दे !

हें जीवन : याची यांना पण किंमत नाहीं ;
दे रक्त तुझें : लोकांची पण भ्रान्त फिटूं दे !

अद्याप किती, रे जीवा, फिकिरींत पडूं मी
हा बद्ध भुकेला आत्मा सुटणार—सुटूं दे !

१९३४

# आतां

अंतराच्या गूढ गर्भीं एकदां जें वाटलें गऽ !
एकदां जें वाटलें तें प्रेम आतां आटलें गऽ !

दूर सोनेरी सुखाचे पाहिले आभास मीं तूं :
रंगलें आभाळ पूर्वी : तेंच आतां फाटलें गऽ !

चांदण्या रात्रींत मागें हिंडलों एकत्र दोघें :
चंद्रिकेनें थाटलें जें तें तमानें दाटलें गऽ !

एकदां जी दो थडीनें वाहिली होती, सखे, त्या
जान्हवीचें शुद्ध पाणी संशयानें बाटलें गऽ !

एकदां ज्यांतून मागें सूर संवादी निघाले
वंचनेनें तोडले ते स्नेहतंतू आंतले गऽ !

शेवटीं मंदावलेल्या वादळी वाऱ्याप्रमाणें
राहणें झालें दिवाणें गीत गाणें कोठलें गऽ !

यातना दुःखांतली अन् चेतना गेली सुखाची :
झाकल्या नेत्रांत आतां अश्रुबिंदू गोठले ग ऽ !

१९३४

# एक वेळीं

एकटा मी, आणि होती एकली तूं.
या गळ्याची आण होती घेतली तूं.
फार वर्षांनीं तुझ्या भेटीस आलों.
कां कपाळाला अढी ही घातली तूं ?

काळमानानेंच आतां लोपले का
मागचे सारे जुने आतूर हेतू ?
संपला सारा जरी आतां जिव्हाळा
यापुढें साधेसुधें सौजन्य दे तूं.

एक वेळीं वाटली होती जिवाला
चांदणी विस्तीर्ण अंधारांतली तूं.

१९३४

# रंकाची राणी

आनंदी, स्वच्छंदी गंधर्वावाणी
प्रीतीच्या दोघांनीं नांदावें रानीं ;
लंघावे मोठाले नाले ;
झेलावे झाडांचे पाले ;
हौशीनें गुंफाव्या पुष्पांच्या माळा :
आतां, गऽ, लोकांचा कंटाळा आला !

हौशीनें सोसावे दोघांनीं धोके ;
हौशीनें घ्यावे, गऽ, वेलींचे झोके !
दोघेही दोघांचे चाकर् ;
वेळेला लाभावी भाकर् ;
प्रीतीनें प्राशावें ओढ्याचें पाणी ;
हासावी आनंदी रंकाची राणी.

दुर्वांचे गालिच्चे विश्रांतीसाठीं ;
भोतालीं रानाची चंदेरी शांती ;
देवाची विश्वासू माया :
कोठेंही टेकावी काया ;
निद्रेनें झाकावा जीवात्मा सारा ;
अंगाला लागावा रानाचा वारा.

१९३४

# किती

आली अनंतरंगी सारी वसंत-सेना :
या श्रांत शांत झोपीं गेल्या परंतु मैना.
आतां कशी घुमावी लावण्यगीतिका ही ?
आला वसंत : माझी झाली परंतु दैना !

माझ्या खुळ्या मना, रे, हा व्यर्थ सर्व दंगा !
चित्रें नको चितारूं, अस्पष्ट शब्दरंगा !
कोठें सरस्वती ? ही मानूं कशी त्रिवेणी ?
अव्यक्त राहिली कां ही आरुणी अनंगा ?

आतां कशी पुरावी भाषा अशी परावी ?
निःशब्द जीवनाला वाचा कधीं फुटावी ?
सांगा, कधीं निघावे हृद्‌बंध, विश्वदेवा ?
टाकूं किती उसासे ? आशा किती धरावी ?

१९३४

# पावसाळा

चिंब झालीं पावसानें भोवतीं रानोवनें :
वर्षती येथें सखीचीं पावसाळी लोचनें.

नाचती पर्णांमधूनी स्वैर थेंबांच्या सरी,
तेविं वस्त्रांतून हीची मुक्तमाला नाचरी.

हालते आहे कळीची पाकळी अन् पाकळी,
चुंबनाधीरा घरीं ही नाचरी ओष्ठावली.

स्वच्छ माझ्या अंगणींची केळ हाले राजसा ;
रंग हीचा गौर आहे केळपानाचा जसा.

हा जलाचा पाट दावी थाट वीजेचा असा :
आसवांचा पूर येथें अंतराचा आरसा.

दूरशा शेतांत कोणी चाळवीली लावणी :
आणि येथें आंत झाली भावनेची पेरणी.

यायचें येवो कधींही धान्य शेतीचें घरीं :
हें बघा, आधींच आलें पीक प्रीतीचें घरीं.

१९३४

# माझीं गाणीं

• १ •

ओळख, रे जीवा, आतां देव-देवा :
मग देह-भावा- संगें नाचूं.

माझा देव सखा सर्वत्र सारखा;
कोणाला पारखा नाहीं नाहीं.

बाहेर अंतरीं उभा खालीं-वरी;
आहे घरींदारीं खरोखर.

विश्वाचें मंदीर, विश्वच ईश्वर,
सगुण सुंदर निर्गुणही.

आतां ओळखलें : विश्वच हासलें.
नाग म्हणे, झालें समाधान.

• २ •

एकाचाच सूर एकतारीवर
मधुर मधुर वाजवावा.

माझा योग-याग आळवावा राग,
डोलवावा नाग नादरंगीं.

मंद मंद चालीं वागीश्वरी आली.
आतां दुणावली कोवळीक.

तन्मात्रांचे पांच नानाविध नाच :
झाला सर्वांचाच एकमेळ.

मन हळुवार झालें एकाकार ;
विविध विकार दुरावले.

१९३४

# त्याला नाहीं कदर्

माथीं झाला सुरू
पिंगा काळा निळा ;
एकाएकीं अस्मानाची न्यारी झाली कळा.

आतां जाऊं कसंऽ :
वैऱ्यावाणी असंऽ —
उराशिराला झोंबत आलंऽ वारंऽ येडंऽ पिसंऽ.

ओला झाला पदर्,
साडी, चोळी सदर् :
दगा दिला या दुस्मानानंऽ त्याला नाहीं कदर्.

११ फेब्रुवारी, १९३५

# कशाला, सखू, रुसावं॰ तरी !

हा पदर शिरावर ; नव्या उरावर तुला गळाभर सरी :
कशाला, सखू, रुसावं॰ तरी !

तूं लावण्याची कळा ;
नजरेंत कसब आगळा ;
उरानुरावर नवी नव्हाळी ; चिरी कपाळीं जरी ;
कशाला, सखू, रुसावं॰ तरी !

ये, उगिच जरासं॰ रुसूं ;
अन् मुक्यामुक्यानं बसूं :
मधेंच खुदकन् हसूं नये तूं अशा पराण्या घरीं ;
कशाला, सखू, रुसावं॰ तरी !

तूं नको धिटाई करूं ;
अन् लहरी नजरा भरूं ;
हसून् जराशी तुझ्या सख्याशीं नको करूं हिरहिरी ;
कशाला, सखू, रुसावं॰ तरी !

२४ एप्रिल, १९३५

# हुरहूर

मी धरूं धिरावा कसा : वखत हा असा.
दे मला जरा भरवसा, हरिणपाडसाऽऽ रे !

हरवला सखा सोबती :
हुरहुरू बघावऽ किती !
थरथरून् किती मी भिलें बघून् हा ससाऽऽ रे !

ही समदी शेती सुनी ;
भवतालीं नाहीं कुणी.
मग फिरूं कशी : मी अशी नवी राजसाऽऽ रे !

नवतींत शोक आगळा :
बघ, भरून आला गळा.
आतलें कुणाला पुसूं : मुक्या दशदिशाऽऽ रे !
दे मला जरा भरवसा, हरिणपाडसाऽऽ रे !

२९ एप्रिल, १९३५

# नेमकें परत जातांना

भेटतांच, मी हासतें जुईसारखी :
राहते तरीही त्यांची ती नजर जरा पारखी.

मी पुन्हा पुन्हा सारखी पाहतें, गडे !
ते परंतु, बाई, डोळे वळवितात दुसरीकडे !

मी पुसतें कांही तरी नवें अन् जुनें :
तेवढेंच चोरावाणी चुकवितात गऽ बोलणें !

कां सदाकदा धरतात अबोला असे ?
सारखे तरी इतरांशीं बोलतात, बाई, कसे ?

छे ! कसा सहूं मी असा दुरावा मुका ?
चांगलेच सारे सारे, वाईट फक्त मीच का ?

मग, दूर मुक्यानें बसून बघतें जरी,
नेमकें परत जातांना हसतात कशाला तरी !

१४ जुलै, १९३५

# नेमकें परत जातांना

भेटतांच, मी हासतें जुईसारखी :
राहते तरीही त्यांची ती नजर जरा पारखी.

मी पुन्हा पुन्हा सारखी पाहतें, गडे !
ते परंतु, बाई, डोळे वळवितात दुसरीकडे !

मी पुसतें कांही तरी नवें अन् जुनें :
तेवढेंच चोरावाणी चुकवितात गऽ बोलणें !

कां सदाकदा धरतात अबोला असे ?
सारखे तरी इतरांशीं बोलतात, बाई, कसे ?

छे ! कसा सहूं मी असा दुरावा मुका ?
चांगलेच सारे सारे, वाईट फक्त मीच का ?

मग, दूर मुक्यानें बसून बघतें जरी,
नेमकें परत जातांना हसतात कशाला तरी !

१४ जुलै, १९३५

# धनगरी गाणें

या माथ्यावरती ठळक चांदण्या नऊ;
ही अवतीं भवतीं हिरवळ हिरवी मऊऽऽ जी !

हीं झुडुपें, झाडें, रानवेल साजरे;
चांदणें हिवाळी, मंद, धुंद, झांजरेंऽऽ जी !

रानांत भोवतीं खचून भरलें धुकें;
हातांत कोकरूं थकून निजलें मुकेंऽऽ जी !

हुरहुरूं नको गऽ, नकोस दचकूं, सरू !
चिवचिवतें चुकलें एक रानपांखरूंऽऽ जी !

या झाकळलेल्या सबंध खोऱ्यामधीं
कुजबुजते गाणें धुंद एकली नदीऽऽ जी !

हा सबंध माझातुझाच सवता सुभा :
भोवतीं मुक्यानंऽ कळप राहिला उभाऽऽ जी

या निजल्या मेंढ्या मुक्यामुक्यानंऽ जुनू !
हळुवार लावणी हळूहळू गुणगुणूंऽऽ जी !

७ ऑगस्ट, १९३५

# ती कळी आणि ती सांखळी

फुलून हासतांच मीं तुला दिली नवी कळी :
खुडून एक एक तूं झुगारलीस पाकळी ;
किती तरी जपून मीं दुवादुवाच जोडला :
करून घाव तूं मधें दुभंगलीस सांखळी.

सुरंग कोवळी कळी : कशी जुळेल ती पुन्हा ?
जुळेल एकदां, तरी कशी फुलेल, सांग ना ?
दुवा दुभंगलास तूं : कसा अभंग मी करूं ?
पुन्हा अखंड सांखळी कशी जुळेल, साजणा !

विशीर्ण, जीर्ण पाकळ्या तशाच वेचतें पिशी ;
दुभंग सांखळी तरी जपून ठेवतें अशी ;
कळी तशीच सांखळी विलोकितें पुनःपुन्हा ;
पुसून ऊन आंसवें विसावतें कशीबशी.

६ नोव्हेंबर, १९३५

# ये जरा जवळ, राजसे गऽ !

ये जरा जवळ, राजसे गऽ !
ये जरा जवळ, राजसे गऽ !

मी तुझा सजण सावळा ;
अन् तुझी चांदणी कळा :
चल, फिरूं बरोबर, असे गऽ !

घे चंद्रकळा काजळी :
हास तूं फुलाआगळी.
कर खरे जुने भरवसे, गऽ !

आणली तुला, मंजुळा,
लालबुंद चोळी, तिला—
बिलवरी, नितळ आरसे, गऽ !

करतील तुला सावली
हालत्या गर्द जांभळी :
चमकतील मग कवडसे, गऽ !

कोवळें हृदय हरघडी
फडफडून घेतें उडी,
हळुवार पाखरूं जसें, गऽ !
ये जरा जवळ, राजसे गऽ !

८ नोव्हेंबर, १९३५

# तुला किनी गऽ

अशी कुठंऽही नको बसूं ;
'मळा कुणाचा ?' नको पुसूं ;
नको नाचवूं तुझा रुपेरी गोफ असा हा तसूतसू,
गऽ नको हसूं !

अशी कुठंऽही नको शिरूं ;
अशी धिटाई नको करूं ;
मला गव्हाळी, तुला नव्हाळी, तुऱ्यातुऱ्यांना नको धरूं,
गऽ नको फिरूं !

नको फिरूं या वनोवनीं
तुझ्या अशा या नवेपणीं :
तुला किनी गऽ सखू, असावा नव्या शिणेचा कुणी धनी !
(मी जसा किनी !)

१९३५

# अपमृत्यू

होतें चढतें जीवन : झाली पण माती ;
आतां ममतेच्या तुटल्या कोमल ताती ;
आतां मरणाचा पडला निर्दय फासा :
अतृप्तच गेली नवसंसारपिपासा.

डोळे मिटलेले ; पडली मान पहा ही ;
आहे उघडें तोंड, तरी बोलत नाहीं ;
छाती फुगलेली दिसते उंच जराशी ;
निर्जीव तरी हे धरले हात उराशीं :

अद्याप गताशाच जणूं झाकत आहे !
अद्याप उसासाच जणूं टाकत आहे !

१९३५

# ओसाडींत बसून

ओसाडींत बसून झुरतें ओसाडींत बसून्.

निमिषच फुललें, नंतर मिटलें फूल उदास हसून् :
ओसाडींत बसून झुरतें ओसाडींत बसून्.

दिसलें मृगजळ फिरलें अवखळ हरिण उगाच फसून :
ओसाडींत बसून झुरतें ओसाडींत बसून्.

फिरतां वणवण माझें जीवन थकलें वाट चुकून् :
ओसाडींत बसून झुरतें ओसाडींत बसून.

१०.३५

## पुन्हा

नको हृदय हासवूं, पुन्हा हें नको हृदय हासवूं.

उगवतांच सुकली मुळी ;
फुलवितांच सुकली कळी ;
सरकतांच जिरली खळी जळावर—कशी पुन्हा नाचवूं ?

तूं दिलींस वचनें जरी
ठरविलींस लटकीं तरी :
जी मुळांत नव्हती खरी प्रीत ती नको पुन्हा भासवूं.

ही नकोच भलती हमी :
पहिलीही नव्हती कमी,
भरभरून पुनरपि सुरंग नंतर नको पुन्हा नासवूं.
नको हृदय हासवूं, पुन्हा हें नको हृदय हासवूं.

१९३५

## काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे

काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे
आलीस तूं एकटी बांधून सारे चुडे.

वारा किती मंद, गऽ !
होतें किती कुंद, गऽ !
होता किती धुंद, गऽ, अंधार मागेंपुढें !

काळी निनांवी भिंती
होती उभी भोवतीं ;
वाटेंत होते किती काटेकुटे अन् खडे !

होऊन वेडीपिशी
आली अवेळीं अशी :
नाजूक प्रीती तुझी : धारिष्ट्य हें केवढें !

माझी तुझी चोरटी
जेव्हां मिळाली मिठी
झालें जगाचें कडें माझ्यातुझ्याएवढें.

हुंकारला पारवा ;
तेजाळला काजवा ;
हालून गेला जरा काळोख चोहूंकडे !

१९३५

दिसेना : आंधळयावाणी किती पाहूं तरी चौफेर् !
जराही स्पर्श होईना : किती घ्यावे तरी मीं फेर् !
पुरे हा छंद : कानोसा कितीदां हर्घडीं घ्यावा ?
किती मारूं तुला हांका : नको राहूं असें बाहेर्.

मनःसंवेद्य ऐकावे किती हे पंचरंगी सूर् !
किती शोधूं तरी आतां : कळे ना हा कुणाचा हूर्.
उसासे मी किती टाकूं ? किती होऊं तरी कष्टी ?
अघोरी, उष्ण अश्रूंचा निघाला पावसाळी पूर्.

निळ्या दिग्वर्तुळामध्यें, परत्रीं अंतराळीं दूर्—
निघाला चंद्र चंदेरी ; उडाला चांदण्यांचा चूर्.
असें मीं पाहिलें तेव्हां मला झाला तुझा आभास् :
वृथा मीं पाहिलें : झाली पुन्हा जागी जुनी हुर्हूर् !

विझाव्या कां बरें आतां नभाच्या तेवत्या वाती ?
सुचे ना मार्ग कांहीही ढगाळी आंधळ्या रातीं.
अरेरे, हा असा आला तुफानी, उग्र झंझावात् :
कसें मीं आवरूं तारूं : सुकाणूं घे तुझ्या हातीं.

इथें कोणी पिता-पुत्रें, कुणी आजा, कुणी नातू,
कुणी मामा, कुणी भाचा, निराळा मी, निराळा तूं :
दुरावे हे किती सोसूं जगाचे हर्घडीं आतां :
इथें या शांत एकान्तीं जिवाला दे जिव्हाळा तूं

नको जाऊं : जरी आहे खरी सारी तुझी शंका ;
चुकीचा, त्याज्य, बेपारी, पहा, आहे तुझा हेका :
दिवाण्या, श्रांत चित्ताला जरी केव्हां चुकून्‌माकून्—
जराशी विस्मृती झाली, तरी तूं विस्मरावें का ?

निशेनें व्यापिली सारी धरित्री मंत्रमोहानें ;
पहा, झोपीं कसे गेले सुखात्मे, या दिशा, रानें !
उदासी, शून्य ही माझी निराशा जागृती आतां
हसावी मुग्ध, मायावी, तुझ्या निःशब्द हास्यानें.

किती मी या झळा सोसूं : उन्हाळा उष्ण आहे फार्.
निवाराही कुठें नाहीं, कुणी नाहीं मला आधार्.
पुढें आतां कसें हिंडूं ? कुठें आहे तरी सिंधू ?
कशानें सर्व जन्मांची अघोरी ही तृषा जाणार् !

१९३५

## आलीस कशाला ?

आलीस कशाला, ग ऽ,
आलीस कशाला !

चाहूल मलाही
कळली पण नाहीं :
बगिच्यांतच माझ्या, ग ऽ, शिरलीस कशाला ?

दावून शहाणे
लटकेंच बहाणे
जवळून जराशी, ग ऽ, फिरलीस कशाला ?

कलवून फुलारी
जमिनीवर सारीं
सांडून फुलें तूं, ग ऽ, लवलीस कशाला ?

म्हटलेंस दिवाणें
मधुसूचक गाणें ;
लडिवाळपणानें, ग ऽ, हसलीस कशाला ?

परतून अखेरी
गेलीस, किशोरी !
हृदयांतच, पोरी ग ऽ, उरलीस कशाला ?

आलीस कशाला, ग ऽ,
आलीस कशाला !

६ मे, १९३६

# फार नको वाकूं

फार नको वाकूं
जरी उंच बांधा ;
फार नको झाकूं
तुझा गौर खांदा.

दोन निळे डोळे
तुझे फार फंदी,
साज तुझा आहे
जुईचा सुगंधी.

चित्त मऊ माझें
जशी रानकाळी :
धुंद तुझी आहे
नदी पावसाळी.

श्वास तुझेमाझे
जसा रानवारा,
प्रीत तुझीमाझी
जशी सांजतारा.

१०.३८

## सांज हासली !

सांज हासली, सजणे, सांज हासली !

वाद हा जरा
थांबवूं पुरा :
विसावली परस्परांत ऊनसावली.

संपवूंचना
वेगळेपणा :
विभक्त पांखरें पुन्हा निडांत भेटलीं.

भोवतीं मुकें
दाटलें धुकें :
घरांत एक मी नि, सखे, तूंच एकली !

१०,३८

# ओढ

स्वार्थसंगर हा म्हणा अथवा म्हणा व्यवहार कीं :
चालली हिरहीर अन् किरकीर ही तर सारखी.
ओरडो, विवळो कुणी : तुडवून या पतितांस हे
धावतात पुढेंपुढें सगळे करून धकाधकी.

येथल्या मुलखांत मी तर एक वाटसरू नवा :
मानवेल कशी मला पण येथली जहरी हवा ?
स्नेहशून्यच लोक हे : सलगी करूं भलती कशी ?
देश हा परका : इथें ममतेस मोबदला हवा.

चाललों इकडून मी तिकडे असाच किती तरी :
शेवटीं पण ही कधीं सरणार सांग मुशाफरी !
एक आपुलकी हवी, असला नको परकेपणा :
लागली हुरहूर रे, पण पोहचेन कधीं घरीं ?

१९३६

# नदीकिनारीं

नदीकिनारीं, नदीकिनारीं, नदीकिनारीं, गऽ !

अवतींभवतीं नव्हतें कोणी ;
नाचत होत्या राजसवाणी—
निळ्या जळावर सोनसळीच्या नवथर लहरी, गऽ !

जरा निळ्या अन् जरा काजळी
ढगांत होती सांज पांगली :
ढवळी ढवळी वर बगळ्याची संथ भरारी, गऽ !

दुसरें तिसरें नव्हतें कोणी ;
तुझेच हसले डोळे दोन्ही :
अवखळ बिजली भरली माझ्या उरांत सारी, गऽ !

सळसळली, गऽ, हिरवी साडी ;
तिनेंच केली तुझी चहाडी :
फडफडल्या पदराच्या पिवळ्या लाल किनारी, गऽ !

वहात होते पिसाट वारे ;
तशांत मीं उडविले फवारे :
खुलून दिसली तुझ्या उराची नवी थरारी गऽ !

कुजबुजलीं भवतालीं रानें ;
रात्र म्हणाली चंचल गाणें :
'गुढघाभर पाण्यांत दिवाणे दोन फरारी, गऽ !'
नदीकिनारीं, नदीकिनारीं, नदीकिनारीं, गऽ !

१९३६

# प्रेमपीठ

तूं कलावती कमला : आणि सांब शंकर मी.
वैभवें हवींत तुला : अन् असा दिगंबर मी.
अन् असून तूं जुलमी पाहिजे तुला समता :
आडवूं नको, सजणे, भाळलों तुझ्यावर मी

प्रेमळास आवडली का कधीं तरी समता :
गऽ, परस्परांमधला भेद हीच सुंदरता.
मी जरी चुका करतों राग तूं नको मानूं :
गऽ, चुकीशिवाय कुठें वाढते खरी ममता !

दूर ती जरी इवली चंद्रकोर चंदेरी
गर्द या वनांत तरी धुंदफुंद अंधेरी.
ती चकाकती सगळी दूर राहिली दुनिया
या तमामध्यें वसवूं प्रेमपीठ शृंगेरी.

१९३६

# चुकलेलें कोंकरूं

दोष कुणाचा, तूंच पहा, नऽ कळतच घडल्या चुका :
वाट शोध शोधली : शेवटीं थकून बसलों मुका.
ऐल कळेना, पैल दिसेना : बघ, सांपडलों इथें
गहन घोर तिमिरांत एकला बन-ओसाडीमधें.

कुणीच नाहीं काय नेणत्या पतिताला आसरा ?
कुठेंच नाहीं दिसत, अरेरे, बुडत्याला कासरा !
घरट्याखालीं पडलें इवलें बिनपंखी पांखरूं ;
हुरहुर बघतें कळपामधलें चुकलेलें कोंकरूं.

तळमळलों, व्याकुळलों, आणिक सभोवार देखलें ;
हाक घातली : पुन्हा पुन्हा पण पडसादच ऐकले.
जिवास होता तुझा भरवसा : फोल ठरविलास ना !
उमेद खचली, आणि तनूची निमालीच चेतना.

मायमाउली, नकोस हयगय गरिबाविषयीं करूं !
चुकलों असलों तरी शेवटीं तुझेंच मी लेकरूं.

१९३६

## जीवनकंथा

चुकीच ही झाली ;
नको पण रागावूं आतां :
अनेक ठिगळांनीं
पुरी कर ही जीवनकंथा.

नको दोष लावूं :
मनोदौर्बल्यच हें माझें.
नको अंत पाहूं :
माझें झाक दैन्य जें जें.

उपऱ्या जगताला
करूं दे विचार समतेचा :
विकलित हृदयाला
भरवसा तुझ्याच ममतेचा.

खडतर वाट अती :
कांटे फार दाटले, रे !
जागोजाग किती
माझें वस्त्र फाटलें, रे !

हताश हातानें
कसें या छिद्रांना लपवूं ?
उघड्या लाजेनें
कसें या जगामधें मिरवूं ?

चुकी जरी झाली
नको पण रागावूं आतां :
अनेक ठिगळांनीं
पुरी कर ही जीवनकंथा.

२४ ऑक्टोबर, १९३७

# उत्कंठा

खोल जमीनीमधून अश्रुत, तरी असावा असा—
झऱ्याचा नाद जसा चालतो ;
नील तरल तिमिरांत झाकल्या पुष्करिणीचा जसा—
निळा थर हळूहळू हालतो ;
धुक्यांत भुरक्या, दूर, निवळत्या संध्यारंगामधें—
भासते मात्र जशी चांदणी ;
असूनही न ऽ आठवणारी, हृदयतरंगामधें—
जशी कल्पना विविधरंगिणी ;
परिमळ भरते सभोवार, पण अगोचरच राहते—
जशी घनवनांत फुलती कळी ;
सर्वांतीत तरी सर्वंकष निरंतरच वाहते—
जशी वास्तवामधें पोकळी ;
अगम्य असला असा, तरी वाटतें असावास तूं !
सख्या, वाटतें दिसावास तूं !

१९३७

# अर्पण

चहूंकडे आघात, घात, अपघातच झाले मला :
जन्मलों त्यांच्याकरितां जणूं !
तरी असूं दे तुझा जिव्हाळा : जीव वाहिला तुला;
दयाळा, फिरव कुठेंही तनू !

पाय जरासे सुखाशेकडे चुकून वळले तरी
तरीही—तरी नीट नेच तूं.
अजाणतेनें या डोळ्यांना पाणी आलें तरी—
पुसावें आपुलकीनेंच तूं.

या जीवाचें भलेंबुरें तें तुलाच कळतें, सख्या,
कशाला घालावी भीड मीं !
सुटला झंजावात : कुठेंही जहाज जावो, सख्या,
सुकाणूं तूं, नुसतें शीड मी !

१९३८

# जीवनाचें गाणें

जीवनरंगांत रंगूं या जीवनरंगांत रंगूं !

आकंठ करून प्रीतीचें पान
सौख्यांत हिंडलों सोडून भान :
आतां या दुःखांत झिंगूं.
जीवनरंगांत रंगूं या जीवनरंगांत रंगूं !

क्षणैक मोहक पाडून भूल
सुकलें साजूक नाजूक फूल :
आतां हें निर्माल्य हुंगूं.
जीवनरंगांत रंगूं या जीवनरंगांत रंगूं !

देऊन कोवळा सोनेरी संग
लोपले सांजेचे राजस रंग ;
काजळी लागली पांगूं.
जीवनरंगांत रंगूं या जीवनरंगांत रंगूं !

१८ नोव्हेंबर, १९३९

## काल, आज आणि उद्यां

फळाफुलाला आला होता खरोखरच, साजणे,
हिवानें अखेर झडला तरू !
क्षणभर खुललें, नंतर सुकलें सुधामधुर चांदणें :
नको वनवास जिवाचा करूं.

आणभाक घालून सारखा तुझा ध्यास लावला :
अबोला हा धरला शेवटीं.
अनन्य प्रीतीशिवाय जगणें अशक्य झालें मला :
आणखी जग हसलें भोवतीं.

हसतें जग पण अजून आहे मला तुझा भरवसा :
तरूला फुटेल, बघ, पालवी.
आज जरी अंधार भासतो गगनावर या असा,
उद्यां बहरेल चंद्रिका नवी.

२४ डिसेंबर, १९३९

# सखू

चढविते गळा कोवळा
    जशी कोकिळा ;
हरिणीस सखूचा ळळा
    किं पडते गळाऽऽ ऽऽ जी !

कवळाच नूर लुसलुसू ;
    नजर देखणी ;
खुलविते निरागस हसूं
    नितळ चांदणीऽऽऽऽ जी !

हलतांच हात : वाजते
    गोठबांगडी ;
लावून जीव नेसते
    किं हिरवी चिडीऽऽ ऽऽ जी !

लेऊन रुपेरी, निका
    गोफ अन् सरी,
पाहते ऊर सारखा
    पोर लाजरीऽऽ ऽऽजी !

लडिवाळ हिचें बोलणें ;
    चाल नाचरी ;
फडफडून राघू म्हणे :
    'सखू साजरीऽऽ ऽऽजी !'

२४ डिसेंबर, १९३०.

## म्हणूं दे, हृदया !

म्हणूं दे, हृदया,
अदय नीतींचें,
नियम-रीतींचें
विषम प्रीतींचें गीत ;

गहन मनिषेनें
जतन केलेल्या,
पण न घडलेल्या,
मधुर मिलनाचें गीत ;

विभव-दैन्याच्या
अशुभ कलहाचें,
व्यथित हृदयाचें,
विकल विरहाचें गीत ;

करुण तपलेल्या
नयनसलिलानें,
हृदयरुधिरानें
सतत भिजणारें गीत ;

विगत आशेच्या
विकट भासांनीं,
कढत श्वासांनीं
सतत सुकणारें गीत,
म्हणूं दे, हृदया,
म्हणूं दे, हृदया !

१९३९

# राजसा, आतां

राजसा,
आतां
कुणाची चोरी !

जरासा थांब :
सख्या, तूं सांब,
उमा मी गोरी !

कशाची लाज :
बुडाली आज
जगाची थोरी.

कशाची रीत :
उफळली प्रीत
करत शिरजोरी.

धरूं ये फेर
इथें चौफेर :
हवा ही भोरी.

१९३९

# अजून

घरदिव्यांत मंद तरी
बघ, अजून जळते वात ;
उजळल्या दिशा, सजणा,
न कळतांच सरली रात !

झाडतां झडेना या
लोचनांतली पण धुंद :
सर्व रात्रभर निजला,
जिवलगा, कळींत सुगंध !

निवळलें, तरी दिसतो
पुसट एक हा तारा ;
बघ, पहाटचा सुटला
मधुर उल्हसित वारा !

फुगविते पिसारा अन्
फिरफिरून डोकवते—
वळचणींतली चिमणी
बघ, हळूच चिवचिवते !

जवळपास वाटेनें
सुभग चालली कोणी :
वाजतें तिच्या भरल्या
घागरींतलें पाणी.

उगीच हासतें माझें
ललित अंतरंग, सख्या !
उमलल्या फुलांमधले
हालले पराग, सख्या !

झोप तूं : मिठीमधला
अलग हा करूं दे हात ;
उलगडूं कशी पण ही
तलम रेशमाची गांठ ?

१९४०

# किती उशीर हा!

किती उशीर हा, किती उशीर हा!

हा प्रयाणकाळ ठेपलाच शेवटीं :
पाचळा जळून ही विझून शेगटी—
राहिला इथें असा उदास गारवा :
किती उशीर हा, किती उशीर हा!

आस सारखी धरून वाट पाहिली :
आटली अखेर, हाय, उर्मि आंतली!
आज धावलीस तूं धरून धीर हा :
किती उशीर हा, किती उशीर हा!

१०.४०

## समाधि

या दूरच्या दूर ओसाड जागीं
किडे-पाखरांवीण नाहीं कुणी ;
हा भूमिकाभाग आहे अभागी :
इथें एक आहे समाधी जुनी.

विध्वंसली काळहस्तांमुळें ही :
हिला या, पहा, जागजागीं फटा ;
माती, खडे आणि आहेत कांहीं
हिच्याभोवतीं भंगलेल्या विटा !

आहे जरी लेख हा, छेद गेला—
जुन्या अक्षरांतील रेघांमधून् ;
दुर्वांकुरें अन् तरू खुंटलेला
निघाला थरांतील भेगांमधून्.

कोठून ताजीं फुलें, बाभळींनीं—
हिला वाहिले फक्त कांटेकुटे ;
ही भंगलेली शलाका पुराणी :
कुणाचें तरी नांव आहे इथें.

रानांतला, ऊन, मंदावलेला,
उदासीन वारा इथें वाहतो ;
फांदींतला कावळा कावलेला
भुकेलाच येथें-तिथें पाहतो !

१९४१

# आतां सुटला धीर !

आतां सुटला धीर,
सख्या, बघ,
आतां सुटला धीर !
कुठवर लपवूं
हृदयामधला
हा रुतलेला तीर ?

हासत वरवर
रोधूं कुठवर
हें नयनांचें नीर ?
भ्रामक, अपुरे
शब्द दुहेरी
वाढवितात फिकीर.

जीवन अथवा
मरण मिळूं दे :
शिणलें हृदयशरीर.
काय खरें तें
नीट कळूं दे :
तूं केलास उशीर.

१९४४

## फुला रे

उघड उघड पाकळी, फुला रे,
उघड उघड पाकळी !

आंतल्या आंत कोंवळें
मधुजीवन कां कोंडलें :
बाहेर हवा मोकळी, फुला रे,
उघड उघड पाकळी !

तमसंकुल सरली निशा ;
नीलारुण हसली उषा :
चौफेर विभा फाकली, फुला रे,
उघड उघड पाकळी !

मलयानिल उदयांतला
बघ, शोधत फिरतो तुला :
कां मृदुल तनू झाकली, फुला रे,
उघड उघड पाकळी !

कीं रहस्य हृदयांतलें
आंतल्या आंत ठेवलें :
ही तुझी कल्पना खुळी, फुला रे,
उघड उघड पाकळी !

१९४४

# चिरवांच्छित ही आपुलकी !

चल, भेट निमिषभर, चंद्रमुखी !

कोण, कसा हें नऽ पुसतां ये :
गोंधळून कर एक चुकी.

ओळख, नंतर पुन्हा दूर कर :
कायमचा, बघ, कोण सुखी ?

परतशील तर—तरी तुझ्यावर
खिळेल माझी नजर मुकी.

असा निरंतर तिरस्कार कर :
तूंच तरी पण जीवसखी.

शिणलें जीवन : मीं धरली पण—
चिरवांच्छित ही आपुलकी !

१९४४

# जाणीव

सांध्यरसानें रंगत रंगत
वाहत होता कोमल वारा;
अवकाशाचें अंतर उजळत
उमटत होती एकच तारा.

तूं आणिक मी बसून तेथें
बोलत होतों सहजच कांही :
सहजच सारें वाटत नव्हतें
त्या दिवशीं पण तुला, मलाही.

उमजत नव्हतें हें कीं तें वा :
ती तर, सजणे, होती प्रीती !
होती प्रीती : परंतु तेव्हां
जाणिव नव्हती, जाणिव नव्हती !

दैवगतीनें वाहत वाहत
अनेक वर्षांनंतर, सजणी,
असेच आलों, बघ, अनपेक्षित
आपण दोघें एक ठिकाणीं !

पुन्हा तूं नि मी बसलों येथें;
बोललीस तूं, मी पण कांहीं :
सहजच वाटत नाहीं पण तें
आज खरोखर मला, तुलाही.

# जाणीव

सांध्यरसानें रंगत रंगत
वाहत होता कोमल वारा ;
अवकाशाचें अंतर उजळत
उमटत होती एकच तारा.

तूं आणिक मी बसून तेथें
बोलत होतों सहजच कांही :
सहजच सारें वाटत नव्हतें
त्या दिवशीं पण तुला, मलाही.

उमजत नव्हतें हें कीं तें वा :
ती तर, सजणे, होती प्रीती !
होती प्रीती : परंतु तेव्हां
जाणिव नव्हती, जाणिव नव्हती !

दैवगतीनें वाहत वाहत
अनेक वर्षांनंतर, सजणी,
असेच आलों, बघ, अनपेक्षित
आपण दोघें एक ठिकाणीं !

पुन्हा तूं नि मी बसलों येथें ;
बोललीस तूं, मी पण कांहीं :
सहजच वाटत नाहीं पण तें
आज खरोखर मला, तुलाही.

अजाण होतों मागें आपण :
नव्हती जाणिव, होती प्रीती ;
उरली आहे आज, सखे, पण
जाणिव नुसती, जाणिव नुसती !

१९४७

३३५

# असाच

वेगळीच जात तुझी ;
वेगळाच ताल :
तूं अफाट वाट तुझी
एकटाच चाल.

एकटाच चालत जा
दूर दूर दूर
गात गात तूंच तुझा
एकटाच सूर.

एकटाच चालत जा
उंच आणि खोल ;
बोल आणि ऐक पुन्हा
तूं तुझाच बोल.

तूं असाच झिंगत जा
विस्मरून पीळ :
तूं असाच फुंकत जा
अर्थशून्य शीळ.

अंतरांत पाहत जा
भास तूं तुझेच ;
शांततेंत ऐकत जा
श्वास तूं तुझेच.

खोल या दरींत अशा
गर्द साउलींत
हो निमग्न तूंच तुझ्या
मंद चाहुलींत.

१९४७

## हसेल रे जग

लगबग लगबग
लगबग लगबग
चल लगबग, सजणा !

फारच आतां उशीर झाला :
लवकर ने रे परत घराला !
करतें तगमग,
करतें तगमग :
चल लगबग, सजणा !

घाबरलें मी : झाकड पडली ;
वीज तशांतच वर कडकडली—
झगमग झगमग
झगमग झगमग :
चल लगबग, सजणा !

सूडच साधत वेऱ्यावाणी
थयथय नाचत आलें पाणी ;
मी भिजतें, बघ,
मी भिजतें, बघ :
चल लगबग, सजणा !

तूंच चुकविली वाट खरोखर :
उगाच आलें तुझ्याबरोबर.
हसेल रे जग,
हसेल रे जग :
चल लगबग, सजणा !

१९४७

# पिसाट मन

मन पिसाट माझें अडलें रे,
थांब जरासा !

वनगान रान गुणगुणलें ;
दूरांत दिवे मिणमिणले ;
मधुजाल तमानें विणलें रे,
थांब जरासा !

गगनांत चमकले तारे ;
झुडुपांत काजवे सारे ;
हें झोंबत आलें वारें रे,
थांब जरासा !

ही खालीं हिरवळ ओली ;
कुजबुजून बोलूं बोली ;
तिमिराची मोजूं खोली रे,
थांब जरासा !

नुसतेंच असें हें फिरणें ;
नुसतेच दिवस हे भरणें ;
नुसतेंच नको हुरहुरणें रे,
थांब जरासा !

१९४७

# नील जलांनो !

ओसाड दऱ्यांतून वहा, नील जलांनो !
रानांतच हासून फुला, रानफुलांनो !
प्राशून पुराणी मदिरा धुंद रुपेरी
अज्ञात विदेशांत फिरा, चंद्रकलांनो !

सौंदर्य, उषे, झाक तुझ्या रम्य तनूचें !
हे रंग, ढगांनो, लपवा इंद्रधनूचे !
हे सर्व तुम्ही दूर रहा, दूर रहा, जा !
पापीच निघाले सगळे पुत्र मनूचे.

आचार विरोधी सगळे जाचक यांचे ;
हेतूच मुळाशीं सगळे घातक यांचे ;
यांना नसते कोमलता वा ममताही
जाळील जगाला सगळ्या पातक यांचें.

१०.४८

## कदाचित

फिरेल चंचलतेनें जेव्हां
ती सगळें विस्मरून चिंतन,
स्वैरपणाच्या सुखांत माझी
नाहीं सय व्हायची तिला पण.

ती फिरतांना चांफ्याखालीं
पटपट त्याचा फुलेल सुमगण;
माझ्या अंतर्गत प्रेमाची
नाहीं सय व्हायची तिला पण.

ती फिरतांना चांफ्याखालीं
द्वबिंदूंचें घडेल सिंचन;
माझ्या अविरत अश्रुजलाची
नाहीं सय व्हायची तिला पण.

बघेल ती मुख इंद्रधनूचें
सुरेल ऐकत कोकिलकूजन;
त्या माझ्या गत मधुगीताची
नाहीं सय व्हायची तिला पण.

विशाल विस्मित नयनांनीं ती
बघेल आकाशाचें अंगण;
असीम माझ्या गत आशेची
नाहीं सय व्हायची तिला पण.

रमेल ती घनतमांत एकट
स्वैरपणानें फिरत वनोवन ;
तिच्या नि माझ्या एकांताची
नाहीं सय व्हायची तिला पण.

तमांतल्या तरुशाखांमध्यें
ती असतांना उभी न्यहाळत
तिला, उसाशागत वाऱ्यानें
सय माझी होईल कदाचित.

१९४९

# सुंदरता

सुंदरतेचें मोहक दारुण
घडलें दर्शन ओझरतेंही
तर मग पुढतें हें जग बुडतें
एकच उरते ओढ अशी ही.

क्षण बघतो जो कुणी विचारा
चिन्मय तारा त्या गगनाची
तो वाऱ्यागत जातो वाहत
छेडत छेडत तार मनाची.

नभमुकुरावर दुरांत दिसतें
बिंबच नुसतें हिचें जुगारी :
उठतातच तर मग सिंधूवर
व्यथित अनावर लहरी लहरी.

तिमिरामध्यें नीलारुण घन
मुकेंच नर्तन ही करतांना
मलय निरंतर करतो हुरहुर
सोडत वरवर श्वास, पहा ना !

हें श्रावणघन- गर्जित सारें,
वादळवारें, विद्युत्‌रेषा—
ती मिळण्याची विश्वमनाची
केक दिनांची व्यथित दुराशा.

१९४९

# नको येऊं तूं !

नको येऊं तूं :
कारण कीं हीं सुकलीं सुमनें,
सुगंध सारा ओसरला गऽ !
झाडावरलीं झडलीं पानें,
कोकिळ गीतच विस्मरला गऽ !
नको येऊं तूं !

१९४०

## मनोगत

चंद्र बुडत असतांना ये तूं
वर असतांना मोहक तारे;
जग निजलें असतांना ये तूं
दाट धुकें पडल्यावर सारें.

नाजुक वाहत, ही तरुराजी
विचलित करतो कोमल वारा;
स्पर्शित कर हनु तशीच माझी,
पुलकित कर हा देहच सारा.

मग लगबग हे उघडत लोचन
थरकत थोडी स्पर्शसुखानें
मी पाहीनच नीट तुला पण
किंचित लाजत चकित मुखानें.

शांत निरामय जग असतांना
तरुपर्णांची कुजबुज ऐकत
त्याहूनहि पण हळूच, सजणा,
सांग तुझें तूं मधुर मनोगत!

चंद्र बुडत असतांना ये पण,
वर असतांना मोहक तारे;
जग निजलें असतांना ये पण,
दाट धुकें पडल्यावर सारें.

१९४९

# तुझ्यासाठीं !

तुझ्यासाठीं
कितीदां
तुझ्यासाठीं रे !

मीं दुहेरी
बांधल्या
खूणगाठी
—खूणगाठी रे !

मीं दुपारीं
सोसलें
ऊन माथीं
—ऊन माथीं रे !

लाविल्या मीं
मंदिरीं
सांजवाती
—सांजवाती रे !

कैक आल्या,
संपल्या
चांदराती
—चांदराती रे !

मीं जगाच्या
सोडल्या
रीतभाती
—रीतभाती रे !

१९४९
मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# तूंच भिला तर

कुजबुजतो तो आहे विकृत ;
मुकाच बसतो तो आहे मृत :

कर हिरिरीनें अन् त्वेषानें
आवेशानें उंच तुझा स्वर ;
गगन-धरेला कंपवून तूं
प्रतिरोधाचें आवाहन कर.

चिडून आतां तुझ्या सकलही
शक्तीनें अन् या दुष्टांवर
नऽ घाबरतां नऽ चळतांना
घाल तुझा हा घाव अनावर.

भिऊं नको रे ! तूंच भिला तर
बुडेल लवकर हें जग सारें,
हे होतीलच विजयी दुर्जन
आणिक सज्जन अगतिक सारे

तूंच भिला तर या जगतावर
दिसेल सत्यच खोट्यावाणी ;
तूंच भिला तर कपटी खोटें
खऱ्याप्रमाणें म्हणेल गाणीं.

तूंच भिला तर बघ वाढेलच
मत्त खळांची रुधिरपिपासा,
विश्वजयाची खळ अधमांची
नऽ शमणारी दुष्ट दुराशा.

सत्य पुकारत झगडत झगडत
हाका मारत जागोजागीं
ही चिरनिद्रित जगदांतर्गत
नीतिमती कर सत्वर जागी.

कुजबुजतो तो आहे विकृत;
मुकाच बसतो तो आहे मृत.

१९४९

## तुम्ही

सुदूरच्या जमिनीचे तुम्ही अहांत प्रवासी :
उदार राघव कां हो तुम्ही अहां वनवासी ?
तुम्ही दुजी वदतां ही अनोळखी परभाषा :
परंतु ती कळण्याला मला नकोत दुभाषी.

१९५०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम............
विभाग..............
क्रमांक.......
नों. दि. ......
REFBK-0008336
REFBK-0008336
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ........